म.ग्रं.सं. वाचनालय, ठाणे
विषय :................
दा. क्र. :
बा.वा.
२८५

# महाराष्ट्राची हांक

डॉ. तु. ता. सावंत

BVBK-0400248

इंद्रायणी साहित्य प्रकाशन, पुणे—३०.

प्रकाशक
श्याम दयार्णव कोपर्डेकर
इंद्रायणी साहित्य,
१२९७ सदाशिव पेठ, पुणे-३०

□

प्रथम मुद्रण
१ ऑगस्ट १९७९

□

© डॉ. तु. ता. सावंत

□

मुद्रक
सा. रा. भंडारी,
भंडारी मुद्रणालय,
२७१ नारायण पेठ, पुणे-३०.

# १. खंडोबाची पाली

उन्हाळ्याची भर दुपारची वेळ होती.

'खंडोबाची पाली' गावातले शेतकरी शेतांवरून घरी परतत होते.

त्याच वेळी काही गुराखी पोरे गावच्या ओढ्याच्या काठी एका झाडाच्या सावलीत बसली होती. ती आपापली भाकरी-चटणीची शिदोरी सोडीत होती.



BVBK-0400248

त्यांची गुरे ओढ्याकाठच्या सावलीत रवंथ करीत बसली होती.

गुराखी पोरे मोठमोठ्याने बोलत होती, हसत होती, एकमेकांना चिडवीत होती.

त्यांनी भाकरीचा घास तोंडात घातला न घातला, इतक्यात वेशीच्या बाजूने त्यांना घोड्यांच्या टापा ऐकू आल्या.

पोरे कावरीबावरी झाली. त्यांचे हात जेथल्या तेथे थांबले. भाकरीचा घास घशात अडकला. जो तो दुसऱ्याकडे पाहू लागला. प्रत्येकाच्या मनात धडकी भरली आणि डोळ्यांत भीती दिसू लागली

सुमारे महिन्यापूर्वी गावावर घोडेस्वारांची धाड आली होती. तो प्रसंग सगळ्यांना आठवला.

एक पोरगा चटकन उठला आणि डाव्या हाताकडील उंच व सपाट जमिनीकडे धावत सुटला. बाकीची पोरे त्याच्या मागोमाग उठली आणि त्याच्या मागून धावली.

त्या उंच व सपाट जमिनीवरून गावाकडून वेशीकडे वाट गेली होती. त्या वाटेच्या दोन्ही बाजूंना दोन प्रचंड झाडे होती. बाकी सगळीकडे खुरटी झुडपे पसरली होती.

तो पोरगा वयाने सगळ्यांत लहान दिसत होता. असेल आठ-दहा वर्षांचा. पण मोठा काटक आणि तरतरीत होता. चेहरा उजळ होता. डोळ्यांत तेज होते. धावण्यात वाऱ्याची गती होती.

आपल्या सोबत्यांना मागे टाकून तो वाटेवरच्या एका झाडाजवळ पोचला. तो त्या झाडावर सरसर चढला. बघता बघता शेंड्याला जाऊन पोचला.

त्याच्या मागोमाग आणखी दोन-तीन पोरे झाडावर चढली.

त्यांनी गावच्या वेशीकडे नजर टाकली. चार घोडेस्वार त्याच बाजूला दौडत येताना त्यांना दिसले.

शेंड्यापर्यंत चढलेला तरतरीत पोरगा झाडाच्या फांद्यांत झाकला गेला होता. बाकिच्यांनी झाडावरून खाली धपाधप उड्या टाकल्या. 'नेतू! नेतू!' म्हणून त्यांनी खूप हाका मारल्या; पण झाडावरच्या मुलाची काहीच हालचाल दिसली नाही.

शेवटी एका मोठ्या मुलाने ओरडून म्हटले,

"नेताजी ! वेशीकडून चार घोडेस्वार येताहेत. ते बादशहाचे शिपाई आहेत. ते आपल्याला पकडतील. उतर खाली. आम्ही चाललो."

—आणि सगळी पोरे जीव घेऊन ओढ्याकडे धावली. हातातल्या

लवलवीत काठीने बसलेल्या गुरांच्या पाठीवर त्यांनी सपासप फटके लगावले. बिचारी गुरे उठली. पोरे त्यांना गावाकडे पिटाळू लागली.

शेवटी गुरांचा कळप गावाकडे उड्या टाकीत निघाला. कळपामागून गुराखी पोरे उधळली. खूप दूर गेली.

झाडाच्या शेंड्यावर बसलेला नेताजी एकदा घोडेस्वारांकडे तर एकदा आपल्या सोबत्यांकडे पाहात होता.

थोड्या वेळाने ते चार घोडेस्वार त्याच झाडाखालून गावाकडे दौडत गेले.

नेताजीने घोडेस्वारांना चांगले पाहून घेतले. प्रत्येकाच्या मांडीखाली उमदा घोडा होता. प्रत्येक स्वार धिप्पाड होता. प्रत्येकाला मूठमूठ दाढी होती. मिशा आकडेबाज होत्या. अंगावर लष्करी गणवेष होता. पाठीवर भलीभक्कम ढाल होती. कमरेला लांबलचक तलवार होती. डोकीवर उंच पठाणी टोपी होती व तीवर पागोटे गुंडाळले होते. पागोट्याचा शेमला पाठीवर सोडलेला होता.

घोडेस्वारांनी पळणारा गुरांचा कळप व गुराखी पाहिले असावेत. कारण ते त्यांच्याच मागोमाग दौडत होते.

वीतभर गुराख्यांच्या मागे डोंगराएवढे घोडेस्वार दौडत आहेत, असे नेताजीला वाटले.

गुरे आणि गुराखी गावात शिरले आणि दिसेनासे झाले. घोडेस्वार थांबले. नेताजीला वाटले, की ते त्याच वाटेने आता परत येतील. आणि झालेही तसेच.

घोडेस्वारांनी घोडे वळविण्यासाठी लगाम खेचला असावा, असे नेताजीला वाटले. तो झाडावरून सरकन खाली उतरला. दोन्ही झाडांच्या खोडांना त्याने एक दोरी बांधली. तो सरसर झाडावर चढला आणि दाट पानांत दिसेनासा झाला.

ते चारही घोडेस्वार गेल्या वाटेने परत फिरले. एक घोडेस्वार पुढे पुढे दौडत होता. तो त्यांचा अधिकारी असावा, हे नेताजीने ओळखले. ते स्वार जवळ जवळ येऊ लागले. नेताजी झाडाखाली डोळे लावून पानांत लपून बसला होता.

इतक्यात स्वार दोन झाडांच्या मध्ये आले आणि त्यांच्या अधिकाऱ्याचा घोडा एकदम जमिनीवर कोसळला. तो अधिकारी दोन्ही हातांवर खाली आदळला. 'या अल्ला ! या खुदा !' ही करुण किंकाळी नेताजीला ऐकू आली.

घोडा का पडला, हे त्यांना कळले नाही. तो दगडाची ठेच लागून पडला, असे त्यांना वाटले.

तिघा घोडेस्वारांनी पटापट खाली उड्या टाकल्या. त्यांनी आपल्या अधिकाऱ्याला उठविले. त्याच्या गळ्याजवळचे हाड मोडले असावे, असे त्यांना वाटले. त्यांनी पडलेल्या घोड्याला उठविले. घोड्याला काहीच लागले नव्हते. जखमी अधिकाऱ्याला इतरांनी घोड्यावर बसविले. तो पडू नये म्हणून त्याला नीट बांधले. मग ते हळूहळू पुढे निघाले.

घोडेस्वार दिसेनासे झाल्यावर नेताजी झाडावरून खाली उतरला. गावावर धाड घालायला आलेल्या स्वारांची आपण चांगली खोड मोडली म्हणून तो स्वतःवर खूश झाला होता. त्याचा आनंद त्याच्या चेहऱ्यावर दिसत होता.

नेताजी हळूहळू गावाकडे निघाला. एकदोनदा मागे वळून ज्या वाटेने घोडेस्वार गेले, त्या दिशेकडे त्याने नजर टाकली. हो, ते परत गावाकडे आले तर ! आता ते परत गावाकडे येत नाहीत, याची खात्री झाल्यावर नेताजी चालू लागला.

दुपारचे ऊन रणरणत होते. जमीन, दगड, डोंगर तापले होते. हवा रखरखीत झाली होती आणि नेताजीच्या हृदयात आग पेटली होती. त्याच्या लहानग्या डोक्यात विचारांचे वादळ उठले होते.

सुमारे महिन्यापूर्वी असेच दहा-बारा दांडगे स्वार गावात आले होते. तो प्रसंग त्याला आठवला.

त्या दिवशी आपल्या मावसबहिणीच्या लग्नासाठी तो मावशीच्या घरी गेला होता. सगळा गाव लग्नाला लोटला होता. मावसबहिणीला तो 'आक्का' म्हणायचा. आक्का त्याला फार आवडायची. त्याच्यापेक्षा चारपाच वर्षांनीच ती मोठी होती. लहानपणापासून तो तिच्याबरोबर खेळला होता. तिचे त्याच्यावर खूप प्रेम होते. त्यामुळे आक्काच्या लग्नाच्या दिवशी तो मोठ्या आनंदात होता. मोठ्या उत्साहाने आक्काच्या लग्नातली लहानसहान कामे तो करीत होता.

त्याची आक्का माळेवर उभी राहिली. भटजींनी मंगलाष्टके म्हणायला तोंड उघडले आणि 'मोगल आले! मोगल आले!' असा ओरडा झाला. लग्नमंडपात गलका माजला. वाट फुटेल तिकडे लोक पळत सुटले.

काही लोकांनी नवरा-नवरी आणि इतर काही माणसांना घरात लोटले. दार आतून बंद झाले. उरलेसुरले लोक पळून गेले.

लग्नमंडप रिकामा झाला.

इतक्यात दहा-बारा दांडगे घोडेस्वार लग्नमंडपात घुसले. त्यांनी मंडप जमीनदोस्त केला आणि ते मावशीच्या घराचे दार ठोठावू लागले. लेचेपेचे घर असते, तर त्या दांडग्यांनी आपल्या लाथांनी केव्हाच मोडले

असते. पण मावशीचे घर सागवानी लाकडाचे आणि मोठे मजबूत होते.

शेवटी त्या दांडग्यांनी घराला चारी बाजूंनी आग लावली. त्या आगीत त्यांनी लग्नमंडपातला कपडालत्ता आणि इतर सामान टाकले. तुपाचा डबा ओतला. आग भडकली. ते नरपशू घोड्यावर बसून जळत्या घराकडे पाहून हसत होते. घराने पेट घेतला. धूर पसरला. ज्वाळा उफाळू लागल्या. घरात कोंडलेल्या माणसांनी किंकाळ्या फोडल्या. आपल्या आक्काची किंकाळी नेताजीने बरोबर ओळखली.

ते सैतान क्रूरपणाने हसत होते.

जळत्या घरातल्या किंकाळ्या थांबल्या आणि ते राक्षस टापटाप आवाज करीत निघून गेले.

समोरच्या घरातून आपण हा प्रकार पाहात असताना आपण चिडलो होतो, हताश झालो होतो आणि शेवटी रडरड रडलो होतो, याची नेताजीला आठवण झाली.

आक्का, आक्काचा नवरा आणि घरातली इतर माणसे जळून मेली. मावशी वाचली; पण हाय खाऊन तिने अंथरूण धरले. पंधरा दिवसांपूर्वी तीही वारली. त्या कुटुंबातले एकटे मावसे उरले. पण वैतागून एका रात्री ते गाव सोडून निघून गेले. अजून त्यांचा शोध लागला नव्हता.

चालता चालता नेताजीच्या डोक्यात संतापाने आगीचा डोंब उसळला.

मोगल आणि आदिलशहा कोणीतरी बादशहा आहेत. त्याचे निजामशहाबरोबर भांडण आहे. त्यांची वर्षानुवर्षे लढाई चालू आहे. निजामशहाच्या बाजूने शहाजी राजे नावाचा शूर मराठा सरदार कित्येक

वर्षे मोगलांशी लढतो आहे. मोगल आणि आदिलशहा यांचे शिपाई असेच घरेदारे, शेतीवाडी जाळीत सुटले आहेत. या गोष्टी नेताजीने वडील माणसांच्या बोलण्यात ऐकल्या होत्या.

पण नेताजीला हे कळत नव्हते, की त्याच्या आक्काला मोगलांच्या शिपायांनी जाळून का मारले? तिने त्यांचा काय अपराध केला होता? आपल्यालाही ते असेच एक दिवस जाळून मारतील!

नेताजीला हेही कळत नव्हते, की आपल्या गावातील वडील माणसे अशा वेळी गप्प का राहातात? आपली घरेदारे जळताना यांना बघवते कसे? आगीत जळताना आपल्या मुलामाणसांच्या किंकाळ्या यांना ऐकवतात कशा? आपल्या गावातली तरुण माणसे घरात लपून का बसतात? ते एकी करून त्या राक्षसांना मारीत का नाहीत?

नेताजीला वाटत होते, की एक मजबूत बांबू घ्यावा आणि या दुष्ट शिपायांना झोडझोड झोडावे किंवा दगड जमवावेत आणि त्यांनी त्या दुष्टांची डोकी फोडावीत.

नेताजीला असेही वाटले, की आपण उमद्या घोड्यावर बसावे, पाठीला ढाल बांधावी, कमरेला तलवार लटकवावी आणि त्या दुष्टांबरोबर जोराची लढाई करावी, त्यांची मुंडकी उडवावीत!

नेताजी गावात जाऊन पोचला होता.

वाटेच्या उजव्या हाताला मारुतीचे देऊळ होते. देऊळ लहानसेच होते

नेताजीचे पाय देवळाकडे वळले. तो मारुतीच्या मूर्तीसमोर गुडघे टेकून बसला. त्याने मारुतीला डोळे भरून पाहिले. दोन्ही हात जोडून त्याने डोळे मिटले आणि त्याने मारुतीची करुणा भाकली—

" जय हनुमान ! देवा ! जागा हो ! ऊठ. देवळाच्या बाहेर ये. माझ्या आक्काची किंकाळी मला अजून ऐकू येते आहे. झोपेतही मला ती किंकाळी ऐकू येते. मी दचकून जागा होतो. देवा, या दुष्टांचा सूड घ्यावासा वाटतो. पण काय करू ? मी अजून लहान आहे रे, मारुतीराया ! धाव घे. तुझ्या शेपटीत गुंडाळून या दुष्टांना आपटून आपटून ठार कर !"

नेताजीने हनुमानाच्या मूर्तीला साष्टांग नमस्कार घातला. उठून कपाळाला शेंदूर लावला. देवळाच्या बाहेर पडून तो आपल्या घराची वाट चालू लागला.

काही पावले चालल्यावर त्याच्या दोन्ही हातांना गावातली घरे लागली.

प्रत्येक घराचे दार बंद होते. उघड्यावर एक कुत्रेही दिसत नव्हते. गाव ओसाड झाल्यासारखा दिसत होता. गावात अशी शांतता त्याला कधीच दिसली नव्हती.

नेताजीला एकही माणूस दिसत नव्हता. पण प्रत्येक घराच्या खिडकीतील डोळे त्याच्याकडे लागले होते.

नेताजीचा हूडपणा सगळ्या गावाला माहीत होता. पण हा पाटलाचा पोर इतका धाडसी असेल, असे कोणाला कधी वाटले नव्हते.

नेताजी आपल्या घरासमोर आला आणि घराचे दार आतून एकदम उघडले. त्याची आई लगबगीने धावली. तिने दोन्ही हातांनी त्याला छातीशी धरले आणि ती म्हणाली,

" माझ्या राजा ! कुठं रे होतास इतका वेळ ? तुझे सोबती आले आणि त्यांनी तो भयंकर प्रकार सांगितला. माझं काळीज की रे फाटलं ! "

—आणि ती ढसढसा रडू लागली. नेताजी गप्प होता. आपल्या

डोळ्यांत अश्रू पाहिल्यावर टचकन रडणारा आपला नेतू आज असा गंभीर का, हे त्या बिचारीला कळेना.

घरात जाऊन बसल्यावरही नेताजी काही बोलला नाही. त्या रात्री तो मनासारखे जेवलाही नाही. रात्री अंथरुणावर पडला तरी त्याच्या चिमुकल्या डोक्यातले वादळ थंड झाले नव्हते. उलट तो मनातल्या मनात संतापला होता. कारण त्याचे वडील त्याला संतापून म्हणाले होते,

" ती पोर जळून मेली, तसा तूबी एक दिस मरशील बग. सत्तेफुडं शेनपन काय उपेगाचं! त्या शिपायांनी तुजी मान मुरगाळली असती, तर घर धावलं असतं का तुला ? "

आपले वडील गावचे पाटील. तेच असे बोलायला लागले, तर इतर लोक काय करणार या जुलुमांपुढे ! आक्का जळून मेली, हा काय तिचा दोष आहे ? आणि माझी मुंडी मुरगाळली असती, तर त्यात माझा काय दोष होता ?

सगळी सत्ता बादशहाच्या शिपायांच्या हाती. ते वाटेल त्याला ठार करतील, घरे जाळतील, मळे लुटतील ! त्यांना अडवणारा गावात कोणीच नाही.

मग आमचे गावात काय राहिले ? घर आमचे नाही. मळा आमचा नाही. बहीण आमची नाही. आई आमची नाही आणि बापही आमचा नाही. मग आमचं आहे कोण ?

नेताजीला झोप येत नव्हती. पण त्याच्या डोक्यात भराभर विचार येत होते.

इतक्यात गावात कोठेतरी कुत्रे भुंकले. मग इतर कुत्री भुंकू लागली. नेताजीला वाटले, गाव अंधारात झोपले आहे. यावेळी कोणीही यावे आणि घरांना आगी लावाव्या. कोण हात धरणार त्याचा ?

इतक्यात कोंबडा आरवला.

नेताजी दुसऱ्या कुशीवर वळला.

थोड्या वेळाने दारावर थाप ऐकू आली. मागोमाग हाक ऐकू आली, " पाटील, अवो पाटील !"

हाक मारणारा एक माणूस नसून अनेक आहेत, हे नेताजीने ओळखले. ते घाईघाईने हाका मारीत होते. त्यांच्या आवाजात भीती होती.

शेवटी हाका मारणारे मोठमोठ्याने दार ठोठावू लागले.

शेवटी आपले वडील अंथरुणावरून उठून दाराकडे गेल्याचे त्याने ओळखले. मग पुढील संभाषण त्याला ऐकू आले--

" कोन हाय रे भाईर ? "

" आमी न्हवं का ? "

" तुमी म्हंजी कोन ? मोगल का आदिलशहा ? "

" अवो पाटील, आमी म्हंजी मी..."

" अरं, तू म्हंजी कोन ? "

" सांगतो की. दार उघडा जरा. "

" म्हंजी नाव सांगितल्याबिगर दार उगडू ? काय काळयेळ हाय का न्हाई ? "

" कसली येळ न् काय ? काळ मातुर आलाय शिवंवर ! "

" काय म्हनतोस ? "

" खरंच सांगतो. ऐका, पाटील. मी सखाराम जाधव. माज्या बाजूला सिदबा उबा हाय. त्याच्या पल्याड खाशाबा अन् त्याच्या पल्याड.... "

इतक्यात पाटलांनी खसकन दार उघडले. सखाराम, सिदबा, खाशाबा आणि इतर दोघेतिघे अंगणात उभे होते.

" अंगणाभाईर या ! " सखारामनं पाटलांना म्हटलं.

सखाराम पुढे, त्याच्यामागे इतर आणि त्यांच्यामागे पालकर पाटील चालू लागले.

नेताजी खाडदिशी अंथरुणातून उठला. कोणाला नकळत तो त्यांच्यामागे निघाला.

अंगणातून बाहेर पडल्यावर वीस-पंचवीस पावले चालल्यावर एका झाडाखाली सखाराम थांबला. नेताजी त्याच झाडामागे उभा राहून त्यांच्याकडे पाहात होता.

गावाच्या पूर्वेला बोट दाखवीत सखाराम पालकर पाटलांना म्हणाला,

" बगा तिकडं. काय दिसतंय ?"

" जाळ. भयंकर जाळ ! "

" कसला असंल ? "

त्या प्रश्नाने पाटलांच्या डोक्यात लख्ख प्रकाश पडला.

नेताजीने त्या दिशेला पाहिले. आगीच्या भयंकर ज्वाला आकाशाकडे उधळत चालल्या होत्या. टेकडीपलिकडच्या गावात आग लागली असावी. दांडग्या सैनिकांनी लोकांची घरे जाळली असावीत, हे सखारामच्या बोलण्यातून नेताजीला कळले.

आगीमुळे तांबूस झगझगीत उजेड पसरला होता, त्या उजेडात दोन गावांच्या सीमेवरील टेकडी स्पष्ट दिसत होती.

" पाटील ! " सखारामने जरा जोरात म्हटले–

" काय ? भुकतोस कशापायी ? "

" इकत्या राती तुमाला मुद्दाम उठिवलं ! "

" का ? "

" आज ह्ये गाव जळलं. उद्या आपलं जळंल. "

" मग ? काय म्हननं तुजं ? "

" आमी गाव सोडून जानार ! "

" कुटं ? "

" कोकनात ! "

" कशापायी ? "

" पोराबाळांचा जीव वाचवायला ! "

" फुडं काय काय म्हननं तुजं ? "

" तुमी येनार काय आमासंगं ? "

पाटील विचारात पडले.

" याल, तर तुमासंगं ! न्हाई, तर आमी चाललो. काय खाशाबा, सिदबा, दाजीबा ! बोला ना ? "

" व्हय. पाटील, आमचं ठरलं. आमी जानार ! "

" ठीक हाय. मीबी येतो ! " पाटील म्हणाले.

नेताजी अंथरुणावर जाऊन पडला. आता त्याची झोप पार उडाली होती. आपण आपलं हे गाव सोडून जाणार या कल्पनेने त्याचा जीव वरखाली झाला. आक्काच्या घराचा चौथरा, गावचा ओढा, तांबडा माळ, मारुतीचे देऊळ या त्याच्या आवडीच्या जागा त्याला आठवल्या. आपण एकदा येथून गेलो, की जन्मात पुन्हा त्या जागा आपल्याला दिसणार नाहीत.

–आणि आपले प्रेमळ सवंगडी ! तेही आपल्याला पुन्हा कधीच दिसणार नाहीत.

नेताजी बेचैन झाला. त्याला वाटले, एकदाचे खूप रडून घ्यावे. –आणि काळोखात तो अंथरुणावर हमसाहमसी रडू लागला.

# २. कारवीच्या जंगलात

शेवटी गाव सोडण्याचा दिवस उगवला.

नेताजी सकाळीच जागा झाला. आज हे गाव सोडून आपण जाणार हे त्याला आठवले. तो बेचैन झाला. त्याच्या मनाला हुरहूर लागली.

नेताजीला सारखे रडावेसे वाटत होते. पण अंथरुणात पडल्या पडल्या त्याने विचार केला. आपले वडील फार रागीट आहेत. ते आपले ऐकणार नाहीत. त्यांनी गाव सोडायचे ठरवले, म्हणजे ते सोडणारच. आपण कितीही रडलो तरी त्याचा त्यांच्या मनावर काही-सुद्धा परिणाम होणार नाही.

आपण यापुढे रडायचे नाही, काही झाले तरी रडायचे नाही, असा निर्धार करून नेताजी उठला.

तोंड धुऊन व दूध पिऊन तो घराबाहेर पडला. आज सगळे गाव त्याला डोळे भरून पाहून घ्यायचे होते. कारण यापुढे या गावात तो पुन्हा येणार नव्हता.

नेताजी एकेका घरापुढून जाऊ लागला. ओटीवर उभ्या असलेल्या म्हाताऱ्या व तरुण स्त्रिया आणि मुले आपल्याकडे आज वेगळ्या नजरेने पाहात आहेत, असे त्याला वाटले.

“काय रे नेतू, आज गाव सोडून जाणार तू?” एक–दोन घरांतून त्याला विचारले.

मानेने होय म्हणून नेताजी पुढे सटकला.

त्याचे सवंगडी त्याला भेटले. त्यांनी तोच प्रश्न त्याला पुन्हा पुन्हा विचारला.

" चला, आज शेवटचं बरोबर फिरून घेऊ या. " असे म्हणून दोनचार सवंगड्यांना सोबतीला घेऊन नेताजी गावाबाहेर पडला.

कोवळी किरणे अंगावर घेत वाटेच्या बाजूला कोंबडी व तिची पिल्ले दाणे टिपीत होती. मध्येच ती 'क्लक क्लक' करत होती, शेरडे टकराटकरीचा खेळ खेळत होती. गुरे शेतमळ्यांतून चालली होती. बायका विहिरीवर पाणी काढीत होत्या.

हे सगळे यापुढेही या गावात असेच जगत राहाणार. आपण मात्र आज हे गाव सोडून जाणार, असा विचार चटकन नेताजीच्या मनात येऊन गेला.

सवंगड्यांबरोबर त्याने तांबडा सपाट माळ, झुळझुळणारा ओढा, निवांत उभे राहिलेले डोंगर, अफाट शेतमळे आणि त्यांवर पसरलेले आकाश पाहून घेतले. आधाशी नजरेने पाहून घेतले. शेवटी जड मनाने त्याने आपल्या सवंगड्यांचा निरोप घेतला. त्याचे दोस्त रडले. त्याला राहवले नाही. त्याचेही डोळे आसवांनी भरून आले.

मग नेताजी एकटाच आक्काच्या घराकडे वळला. आता घर कोठे उरले होते ? तो घराच्या चौथऱ्यावर बसला. खूप वेळ बसला. शेवटी उठला. तेथून जाताना चौथऱ्यावरची चिमूटभर माती त्याने आपल्या कपाळाला लावली.

मग तो मारुतीच्या देवळात गेला. त्याने हात जोडले. मनोमनी प्रार्थना केली. शेवटी त्याने मनापासून मारुतीरायाची करुणा भाकली–

" मारुतीराया ! हे तुझं शेवटचं दर्शन. माझा हा शेवटचा नमस्कार. माझ्या गावच्या देवा, कोठेही गेलो तरी मी तुला विसरणार नाही. देवा, मला बळ दे– खूप बळ दे. "

तिन्हीसांजेला बैलगाड्या सुटल्या. नेताजीने अंधारात खंडोबाच्या पालीची सीमा ओलांडली. गाड्या हळूहळू कोकणाच्या दिशेने निघाल्या.



दिवसामागून रात्र जाऊ लागली. शेतमळे, सपाट माळ, बिकट घाट दाट जंगले मागे पडू लागली.

काही दिवसांनी कुलाबा जिल्ह्यातील चौक गावी गाड्या पोचल्या. सखारामच्या ओळखीचा माणूस भेटला.

नेताजी चौक गावचा रहिवासी झाला.

नेताजीचे वडील पालकर पाटील हा कर्तबगार माणूस होता. थोड्याच दिवसांत त्याने घर उभारले, शेतमळे खरेदी केले; गाईबैल विकत आणले आणि आपला संसार चौक गावात थाटला.

नेताजीही आपल्या उद्योगाला लागला होता. त्याने आपल्या वयाची मुले आपल्याभोवती जमा केली.

नेताजी दिसायला चलाख, बोलका आणि मोठा धीट होता. धावण्याच्या शर्यतीत तो नेहमी पुढे असे. मुलांना तो फार आवडू लागला. दोन–तीन गुंड मुले त्याच्याशी फटकून वागत. ती वयानेही मोठी होती. नेताजीने त्यांची पर्वा केली नाही.

एक दिवस नेताजी सवंगड्यांना बरोबर घेऊन जंगलात फिरायला गेला. तेथे एका झाडाखाली त्याला मारुतीची मूर्ती सापडली. नेताजीला आनंद झाला. त्यांनी तेथेच मारुतीची स्थापना केली. मूर्तीवर तेल ओतले, शेंदूर माखला. थोड्याच दिवसांत मूर्तीवर लहानसे देऊळ उभे झाले.

आता सांजसकाळ नेताजी आणि त्याचे सोबती मारुतीच्या देवळात जमू लागले. व्यायाम करू लागले. मारुतीजवळ बळ मागू लागले.

वाढत्या वयाबरोबर त्यांचे खेळ बदलले. आता त्यांनी तीरकमठा तयार केला, लाकडाची तलवार घडवून आणली, खंजीर तयार केला.

नेताजी संवगड्यांना तलवारीचे हात शिकवू लागला. तीरकमठा घेऊन त्यांच्याबरोबर जंगलात फिरू लागला, शिकार करू लागला.

नेताजीचे वडील चौक गावाचे पाटील झाले. नेताजीने वडिलांकडून एक तट्टू मिळविले. त्यावर बसून तो गावातून आणि जंगलातून फिरू लागला. आता त्याने खरी ढाल तलवार आणि खंजीर मिळविला.

एक दिवस संध्याकाळी नेताजी तट्टावर बसून गावाबाहेर गेला होता. एका मळ्याजवळून तो चालला होता. इतक्यात त्याचे लक्ष मळ्यातील विहिरीकडे गेले. विहिरीवर एक तरुण मुलगी पाणी काढीत होती आणि एक तरुण मुलगा तिची छेड काढीत होता. आसपास कोणीच नव्हते.

नेताजी लगेच विहिरीकडे गेला. त्याने त्या गुंड मुलाला ओळखले. चौकात आल्यापासून तो गुंड नेताजीच्या विरुद्ध होता. त्याला आपल्या

बाल वाङ्मय विभाग
दा. क्र २४८ दिनांक
विषय किशोर क्र. २२८



ताकदीचा मोठा गर्व होता. सगळी मुले त्याला टरकून असायची. काही मोठी माणसेही त्याला घाबरत. तरुण मुली त्याला नेहमी टाळीत.

" लखू, सोड तिचा हात ! " नेताजी ओरडून म्हणाला.

" कोण ? नेतू ? बापाच्या पाटिलकीचा मला रुबाब दाखवतोस ? "

" माझा बाप काढतोस ? माझा बाप पाहिजे तुला ? तो बघ, माझा बाप इकडेच येतोय ! "

असे बोलून नेताजीने समोर बोट दाखविले. लखूने त्या दिशेला पाहिले. तेवढ्यात विजेच्या चपळाईने नेताजीने लखूला दोन्ही हातांनी उचलले आणि विहिरीत फेकले.

लखू विहिरीच्या पाण्यात आदळला. त्याच्या नाकातोंडात पाणी गेले. पण पाण्यावर येताच त्याने स्वतःला सावरले. विहिरीतून तो बऱ्याच कष्टांनी बाहेर आला आणि नेताजीकडे न पाहाताच आपल्या वाटेने निघून गेला.

त्या दिवसापासून नेताजीचा दरारा सगळ्या गावात पसरला.

नेताजी आता तरुण झाला होता. मारुतीची उपासना फळाला आली होती. त्याचे शरीर पोलादासारखे बनले होते. डोळ्यांत वीज लकाकत होती. हृदयात उमेद मावत नव्हती पोटात गावकऱ्यांची माया मावत नव्हती. मनात आकांक्षी विचार मावत नव्हते. मनगटांत ताकद मावत नव्हती आणि गावात नेताजी मावत नव्हता. इतका त्याचा उत्साह वाढला होता. गावचे डोंगर त्याला ठेंगणे वाटत होते. महापुराने भरून उधळणारी गावची नदी त्याला उथळ वाटत होती.

पालकर पाटील वारले आणि नेताजी चौक गावचा पाटील झाला.

गावाला तरुण, महत्त्वाकांक्षी पाटील मिळाला. गावकऱ्यांना कैवारी लाभला.

नेताजीसमोर गावकऱ्यांची भांडणे निकालासाठी येऊ लागली. तो योग्य तो न्याय देऊ लागला. भांडखोरांना शासन होऊ लागले. गुंडांना जरब बसू लागली. गाव सुखी होऊ लागला.

दिवसामागे दिवस जाऊ लागले नेताजीचा दरारा गावोगाव पसरू लागला. चार–पाच वर्षे मोठी मजेत गेली.

एका रात्री गावात भिल्लांनी दरोडा घातला. दुसऱ्या दिवशी गावकरी नेताजीच्या घरासमोर जमले. त्यांनी आपले गाऱ्हाणे नेताजीपुढे मांडले. त्याने त्यांना धीर दिला. भिल्लांचा बंदोबस्त करण्याचे आश्वासन दिले.

एक दिवस नेताजीला बातमी लागली, की रात्री भिल्ल गावात पुन्हा दरोडा घालणार आहेत.

नेताजीने आपले वीस–पंचवीस तरुण दोस्त जमविले. काळोख पडल्यावर तो त्यांच्यासह वाटेवरील दाट झाडीत दबा धरून बसला. मध्यरात्रीला भिल्लांची चाहूल आली. आणि ते समोर येताच नेताजीने दोन्ही बाजूंनी त्यांच्यावर हल्ला केला.

त्या अचानक हल्ल्याने भिल्ल घाबरले आणि वाट फुटेल तिकडे जंगलात पळू लागले. नेताजी व त्याचे सोबती त्यांचा पाठलाग करू लागले. हां हां म्हणता भिल्ल दाट जंगलात शिरले आणि दिसेनासे झाले.

नेताजी आणि गावकरी मागे परतले. इतक्यात वाटेवरच्या एका जाळीमागे दोन डोळे लकाकले. नेताजीने ते पाहिले आणि एकदम झडप घातली. पण भिल्लांचा नायक मोठा चपळ होता. त्याने उडी मारली आणि हरणासारख्या उड्या टाकीत तो कारवीच्या जंगलाकडे धावला.

नेताजीही त्याच्यामागोमाग धावू लागला. जाळ्या मागे टाकीत,

घळी उतरत, दरडी ओलांडीत भिल्ल जिवाच्या करारानें पळत होता. भिल्ल मधे मधे मागे पहात होता. असा चिकाटीने पाठलाग करणारा त्याला आजवर कोणी भेटला नव्हता.

कारवीच्या दाट जंगलातून ते आता धावत होते.

इतक्यात एकाएकी भिल्ल उलटला. त्याने उजव्या हातातील जंबियाचा नेताजीवर वार केला.

नेताजी चपळाईने बाजूला झाला. आपल्या कमरेचा जंबिया त्याने हातात घेतला आणि सामन्याच्या पवित्र्यात तो उभा राहिला.

त्या काळ्याकभिन्न भिल्लाने नेताजीला पुरे पाहून घेतले. त्याला तो किरकोळ वाटला. त्याने आपले पांढरेशुभ्र दात विचकले आणि प्रचंड



झेप घेऊन नेताजीवर जोराचा वार केला. नेताजीने चपळाईने बाजूला उडी घेतली. भिल्ल दाणकन जमिनीवर आदळला. नेताजी त्याच्या

पाठीवर स्वार होऊन बसला. त्याच्या पायांची पोलादी पकड कमरेला बसताच भिल्ल मनात वरमला.

दोघांची खूप झटापट झाली. दोघेही रक्ताने न्हाले. असे भयाण द्वंद्वयुद्ध कारवीच्या जंगलाने कधीही पाहिले नव्हते.

शेवटी नेताजीने एक जोरदार लाथ भिल्लाच्या छाताडावर हाणली. भिल्ल उताणा पडला. चित्त्याच्या झडपेने नेताजीने त्याच्या पोटावर उडी घेतली आणि उजव्या हातातला जंबिया भिल्लाच्या हृदयात जोराने खुपसला.

कारवीचे दाट जंगल पहाटेच्या वाऱ्याने त्याचवेळी थरकले.

# ३. अनोळखी मावळा

नेताजीने भिल्लांच्या टोळीच्या नायकाला ठार केले आणि चौक गावावरचे संकट टळले.

नेताजीच्या धाडसाने चौक गाव बेहोष झाला. असा धाडसी वीर त्या गावाने पूर्वी कधी पाहिला नव्हता.

म्हातारेकोतारे, मुलेबाळे, स्त्रीपुरुष सगळे नेताजीवर खूश झाले. त्याची कीर्ती गावोगाव पसरली.

अशा वेळी एक दिवस पुण्याची एक बातमी चौक गावात येऊन पोचली. शिवाजीराजांनी तोरणा किल्ल्यावर स्वराज्याचे तोरण बांधले, ही ती बातमी होती.

ही बातमी ऐकून नेताजीचा आनंद त्याच्या हृदयात मावेना. त्याला वाटले–लगोलग पुण्याला जावे, शिवाजीराजांना लवून मुजरा करावा आणि अर्जी करावी, की ' महाराज, या सेवकाला आपल्या चाकरीत घ्या ! '

असा पराक्रमी पुरुष महाराष्ट्रात निर्माण झाला, या बातमीने नेताजी वेडा झाला होता. शिवाजी महाराजांना पाहाण्यासाठी आणि मुजरा करण्यासाठी त्याचा जीव दिवसरात्र तळमळू लागला.

–आणि एक दिवस बातमी येऊन पोचली. हतनोलीने देशमुख चौक गावावर हल्ला करण्यासाठी कारवीच्या जंगलातील भिल्लांना चिथावीत आहेत.

चौक गाव कल्याणच्या मुसलमान सुभेदाराच्या अमलाखाली होते. सुभेदाराकडून नेताजीला गावाच्या रक्षणासाठी मदत मिळू नये म्हणून याच देशमुखाने त्याच्याकडे नेताजीविरुद्ध खोट्या कागाळ्या लिहून कळविल्या होत्या.

ही बातमी भयंकर होती. चौक गाव भयंकर धोक्यात होते.

नेताजीने गावकऱ्यांना मारुतीच्या देवळासमोरच्या मैदानावर जमवले. त्यांच्यासमोर उभा राहून नेताजी बोलला,

" माझ्या भावांनो, आज तुम्हांला मी मुद्दाम बोलावलं आहे. आपल्या गावानं भिल्लांना शासन केलं. आपले गाव शूरांचे गाव आहे. ही गोष्ट इतर लोकांना आवडलेली नाही. ते लोक दुबळे आहेत, भेकड आहेत, नीच आहेत. आपण त्यांच्यासारखे भेकड नाही, याचं त्यांना वाईट वाटलं आहे. ते आपला मत्सर करू लागले आहेत.

" हतनोलीचा देशमुख हा या भेकड लोकांचा नायक आहे. कारवीच्या जंगलातील भिल्लांना तो आपल्याविरुद्ध चिथावीत आहे. पण या देशमुखाला ठाऊक नाही, की चौक गावाकडे वाकडा डोळा करून

पाहाण्याची त्या भिल्लांची हिंमत नाही. जर कोणी चौक गावाकडे वाकड्या नजरेनं पाहिलं, तर त्याचे डोळे फोडल्याशिवाय आम्ही राहाणार नाही. हे त्यांनी खूप समजून असावं.

" हतनोलीचा देशमुख आमच्यापेक्षा मोठा अधिकारी आहे. तो आमच्यापैकी आहे. पण तो जर आमच्या गावाच्या जिवावर उठला, तर त्यालाही आमच्या मनगटातली ताकद दाखविल्याशिवाय आम्ही राहणार नाही.

" आपापली घोडी तयार ठेवा. आपापली शस्त्रं तयार ठेवा. पोरी-बाळींनाही तलवार चालवायला शिकवा. चौक गावावर जो कोणी हल्ला करायला येईल, तो जिवंत परत जाता नये.

" चौक गावाचं रक्षण करणं हे कल्याणच्या सुभेदाराचं कर्तव्य आहे. आपल्या देशमुखाचं काम आहे. ते आपलं कर्तव्य करीत नसतील, तर आपल्याला आपल्या पायांवर उभं राहायला पाहिजे. या परक्या लोकांवर यापुढं आपण अवलंबून राहाणार नाही.

" स्वतःची हिंमत, स्वतःची ताकद आणि स्वतःची तलवार हीच आपलं गाव राखतील.

" देशमुख येवो, आदिलशहाचा सुभेदार येवो, नाहीतर मोगल येवो. आम्ही आमची उभी पिके लुटू देणार नाही, घरे जाळू देणार नाही, आणि मुलेमाणसे मारू देणार नाही, अशी प्रत्येकाने मनोमनी शपथ घ्या. याद राखा, या गावात फक्त एक माणूस जरी उरला तरी गाव लढवले जाईल, अशी हिंमत बाळगा."

नेताजीच्या सांगण्याप्रमाणे लोक कामाला लागले. गावात दिवसरात्र गस्त सुरू झाली.

दिवसामागून दिवस गेला. पंधरा दिवस मागे पडले. गावावर भिल्लांचा दरोडा पडला नाही.

पण सोळाव्या दिवशी एक घोडेस्वार नेताजीच्या घरासमोर उतरला. घोड्याच्या टापा ऐकून नेताजी अगोदरच ओटीवर आला होता.

घरासमोरच्या झाडाला घोडा बांधून घोडेस्वार मोठ्या ऐटीत नेताजी-समोर जाऊन उभा राहिला.

त्याला पाहाताच नेताजीला खंडोबाच्या पालीत पाहिलेल्या चार घोडेस्वारांची आठवण झाली.

तशीच मूर्ती, तसाच वेश आणि तसाच आडदांडपणा!

नेताजीने भिंतीवर लटकलेल्या तलवारीकडे पाहिले आणि मनातल्या मनात कसला तरी निश्चय केला.

" नेताजी कौन है ? "

" मैं हूँ । क्यों ? "

" अमीनसाबने बुलाया है । अभी के अभी । "

" लेकिन क्यों ? "

" तुम उस शिवाजी को शामील हो ? "

" शिवाजी ? "

" हां ! वो बदमाश, काफिर...."

" जबान संभालकर बोलो, नहीं तो...."

" नहीं तो क्या ? "

त्या मग्रूर पठाणाला तोंडाने उत्तर देण्याऐवजी नेताजीने भिंतीवरील तलवार काढण्यासाठी पाठ फिरविली. हातात तलवार घेऊन त्याने तोंड फिरविले आणि पाहिले तो...

पठाणाच्या जागी एक मावळा उभा असलेला त्याला दिसला. मावळ्याच्या हातात पठाणाचा वेश लोंबत होता.

नेताजीकडे हसून पाहात मावळा बोलला,

" नेताजीराव, मी महाराजांचा माणूस ! तुमची परीक्षा घेण्यासाठी मला महाराजांनी तुमच्याकडे पाठवलं ! "

" महाराजांनी पाठवलं ? "

" होय, शिवाजीमहाराजांनी ! महाराज गुणांचे चाहते आहेत. तुमच्यासारखी शूर माणसं महाराजांना फार आवडतात. "

" महाराज मला आपल्या सेवेत घेतील ? "

" त्याचसाठी मला पाठवलं आहे. कोकणातले या बाजूचे किल्ले महाराजांनी स्वराज्यात आणायला सुरुवात केली आहे. प्रत्येक किल्ला वर्षभर लढविता यावा एवढा दाणागोटा किल्ल्यावर भरून ठेवायला सुरुवात झाली आहे. त्यासाठी या जिल्ह्यातला तांदूळ हवा आहे. पण मोगलांनी हतनोलीच्या देशमुखाला पत्र पाठवून शिवाजी महाराजांना तांदूळ नेऊ देऊ नको, असं कळवलं आहे. हतनोलीचा देशमुख, गव्हाणचा देशमुख आणि इतर बरेच देशमुख मोगलांच्या बाजूचे आहेत. त्यांचा बंदोबस्त करायचा आहे. ती कामगिरी महाराज तुमच्याकडं सोपवणार आहेत. त्यासाठी मी तुम्हांला महाराजांकडं न्यायला आलो आहे. चला ! "

" लगेच ? कुठं ? "

" कारवीच्या जंगलात ! महाराज लगेच पुढल्या कामगिरीवर निघणार आहेत ! "

नेताजीने पोशाख चढविला. पाठीला ढाल बांधली. कमरेला तलवार लटकावली आणि आपला उमदा घोडा तबेल्यातून बाहेर काढला.

–आणि त्या अनोळखी मावळ्याबरोबर घोडा टापटाप उडवीत मोठ्या उत्साहाने नेताजी निघाला.

# ४. महाराजांचा लखोटा

शिवाजी महाराजांना मुजरा करून नेताजी चौकला जायला निघाला.

दाट जंगलातून तो घोड्यावरून चालला होता.

सूर्य डोंगराआड जात होता. तिन्हीसांजा जवळ येत होत्या. नेताजी एकटाच चालला होता. महाराजांनी दिलेली मोहोरांची थैली त्याच्या कमरेला बांधलेली होती. दरोडेखोर भिल्लांच्या गुहेजवळून त्याची वाट जात होती.

दाट जंगलातून एक नदी खळाळून वाहात होती. नदी पार करून नेताजीला पुढे जायचे होते.

नेताजी घोडा हळूहळू चालवीत होता. कारण वाट खडकाळ व उंचसखल होती.

तो नदीच्या काठावर पोचला. त्याने नदीतील वाटेकडे नजर टाकली. संध्याकाळचे कोवळे किरण अंगावर घेत एक वाघ वाटेवरच नदीचे पाणी पीत उभा होता. त्याच्या तोंडाचा ' मचाक मचाक ' आवाज येत होता.

घोड्याने वाघाला पाहिले. वाघाला भिऊन तो मागील दोन पायांवर उभा राहिला. नेताजीने आपली घोड्यावरची मांड अधिक घट्ट केली.

वाघाला चाहूल लागली. त्याने मागे वळून पाहिले. नेताजीने वाघाच्या नजरेला नजर दिली. वाघ उजव्या हाताला वळला आणि दाट झाडीत शिरला. नेताजी नदी पार करून पुढे निघाला.

सूर्य डोंगराआड गेला. संधिप्रकाशात नेताजी पुढे चालू लागला.

तो भिल्लांच्या गुहेजवळ पोचला, तेव्हा काळोख पडला होता. नेताजीने कानोसा घेतला. गुहेत भयाण शांतता पसरली होती. भिल्लांनी गुहेतील आपली वस्ती हलवली असावी, असा तर्क करून नेताजी पुढे चालू लागला.

मध्याह्न रात्री नेताजी घरी पोचला. आपल्या अंगणात दिवटी पेटत असल्याचे त्याला दुरूनच दिसले. जवळ जाऊन पाहतो, तो गावातले तीसचाळीस तरुण अंगणात बसलेले त्याला आढळले. ते त्याचीच वाट पाहात होते.

सकाळी नेताजी पठाण शिपायाबरोबर बाहेर गेला, ही बातमी गावात पसरली. एक-दोघांनी नेताजीला पठाणाबरोबर घाईघाईने जाताना पाहिले होते. रात्र झाली तरी नेताजी घरी आला नाही, त्यामुळे गावकऱ्यांना चिंता वाटली. त्यामुळे एकेक नेताजीच्या घरी आला. ते सगळे नेताजीला शोधायला निघावयाच्याच विचारात होते.

नेताजीने सगळा प्रकार जमलेल्या तरुणांना सांगितला. त्यांच्यांत आनंदाची लाट उसळली. शेवटी नेताजी म्हणाला,

" मी शिवाजी महाराजांना पाहिलं. त्यांच्या तेजानं दिपून गेलो. महाराजांच्या रूपात मला श्रीकृष्ण भेटला, श्रीराम भेटला. शिवाजी महाराज म्हणजे देवांचा देव ! महाराज सूर्यासारखे तेजस्वी आहेत. सिंहाच्या छातीचा, पोलादी मनगटाचा आणि विशाल बुद्धीचा महापुरुष आपल्या गावाजवळून गेला. गावकऱ्यांनो, आपले गाव धन्य झाले. महाराजांनी तुम्हांला सांगितलं आहे, की सगळ्यांनी शिलेदार व्हा. तुम्हांला घोडा घ्यावा लागेल. महाराज पगार नेमून देतील. बोला, कोण कोण शिलेदार व्हायला तयार आहेत ? "

सगळ्यांनी हात वर केले. थोड्याच दिवसांत चौक गावात घोडेच

घोडे दिसू लागले. हां हां म्हणता नेताजीच्या हाताखाली शंभर शिलेदार तयार झाले.

शिवाजी महाराजांचा कोणी ना कोणी माणूस कधी घोड्यावरून तर कधी पायी नेताजीच्या घरी येजा करू लागला. नेताजीसाठी महाराजांचा हुकूम आणू लागला.

एक दिवस महाराजांचा निरोप आला— पाचशे पोती तांदूळ अमूक अमूक गडावर पाठवा.

नेताजीने महाराजांचा हुकूम शिलेदारांना सांगितला. ते झटपट कामाला लागले. पाचशे पोती तांदूळ जमा झाला. बैलांच्या पाठीवर पोती लादून रात्री निघायचे ठरले. बरोबर नेताजी आणि त्याचे शिलेदार जाणार होते.

पण दुपारी नेताजीच्या माणसाने बातमी आणली — ही पोती अडविण्याचा देशमुखांचा बेत आहे. त्यांची माणसं लाठ्याकाठ्या आणि कुऱ्हाडी घेऊन जंगलात आडवी येणार आहेत.

नेताजीने आपली चारपाच माणसे त्या वाटेने अगोदरच पुढे पाठविली. ठरल्याप्रमाणे रात्र होताच बैलांच्या पाठीवरून तांदळाची पोती निघाली. नेताजी आणि शिलेदार बंदोबस्ताने निघाले.

वाटेवरच नेताजीच्या माणसांनी बातमी आणली. नेताजीने बैल तेथेच थांबविले. पन्नास शिलेदार बरोबर घेऊन नेताजी आडवाटेने पुढे निघाला.

देशमुखांची माणसे वाटेकडे डोळे लावून झाडीत लपून बसली होती. नेताजीने पन्नास शिलेदारांसह त्यांना त्या दाट काळोखात गुपचूप घेरले. एकदम हल्ला केला. त्या आकस्मिक हल्ल्याने देशमुखांची माणसे घाबरून गेली. जीव वाचविण्यासाठी ती अंधारात धावत सुटली.

जिवाच्या आकांताने धावताना कोणी झाडावर, कोणी काटेरी जाळीत, कोणी खडकावर, कोणी खड्ड्यात आपटून मेली, जखमी झाली.

—आणि तांदळाची पोती घेऊन बैल त्या वाटेने सावकाश चालू लागले.

तांदूळ पोचवून नेताजी आणि त्याचे शिलेदार चौकाला परत आले. एकदोन दिवसांत नेताजीला बातमी लागली, की आपल्या कामाला विरोध करण्यात वडगावच्या देशमुखाचाही हात आहे.

नेताजीने विचार केला, हा काटा राहू देता कामा नये. हा पुढे त्रास देईल. हा काटा उपटून काढलाच पाहिजे.

—आणि एका रात्री नेताजी आपले शिलेदार घेऊन वडगावच्या दिशेने निघाला.

वडगावचा देशमुख म्हणजे केवढा मातबर माणूस ! तो बादशहाचा मोठा अधिकारी. दरबारी त्याला केवढा मान ! पाटील आणि शेतकरी म्हणजे त्याच्या दारावरची कुत्री ! त्याने नेताजीची कशाला पर्वा करायची ? तो आपल्या वाड्यात शिसवी पलंगावरील पराच्या गादीवर डाराडूर झोपला होता.

इतक्यात नोकरांची आरडाओरड झाली. भयंकर कल्लोळ माजला. नाइलाजाने देशमुख उठून बसला. समोर बघतो, तो हातात नागवी तलवार घेऊन नेताजी उभा. सगळा वाडा नेताजीच्या शिलेदारांनी आपल्या ताब्यात घेतला होता.

" कोण रे तू ? " देशमुखाने देशमुखीच्या तोऱ्यात विचारले.

" मी शिवाजी महाराजांचा सरदार ! " नेताजी म्हणाला.

" म्हणजे चौकचा पाटीलच की नाही ? "

" आता नाही. आता मी देशमुखाचा नोकर नाही ! "

" बरोबर. आता तू दरोडेखोर आहेस. "

" ....आणि आमचे तांदूळ लुटायला माणसं पाठविणारा तू कोण ?"

नेताजीने शिलेदारांना इशारा केला. त्यांच्या तलवारींची लखलखती टोकं देशमुखाला चारी बाजूंनी भिडली.

“ हवी ती चीजवस्तू घे आणि वाडा खाली कर. तावडतोब ! ” नेताजीने हुकूम सोडला.

रातोरात देशमुखाला वाडा सोडून जावे लागले !

वडगावच्या वाड्यात नेताजीने आपले लष्करी ठाणे सुरू केले.

दिवसेंदिवस शिलेदारांची संख्या वाढू लागली. नेताजीने आपल्या शिलेदारांना नेहमी फिरते ठेवले. तोही कधी चौकात तर कधी वडगावात राहू लागला. तो या गडावरून त्या गडावर, या ठाण्यावरून त्या ठाण्यावर वाऱ्यासारखा दौडत असे.

खांडस, बेलापूर, अवचितगड, मेढे, चौक, वडगाव हा सगळा मुलूख नेताजीच्या पायांखालचा होता.

एकदा नेताजी वर्धनगडावर होता. महाराजांचा लखोटा आला.

विजापूरचा सरदार रणदुल्लाखान आणि बाजी घोरपडे हे शिवाजी महाराजांवर चालून आले होते. विजापूर दरबारने महाराजांवर स्वारी केली होती. खान आणि घोरपडे वाईला तळ देऊन बसले होते. स्वराज्यावर पहिले संकट आले होते. महाराजांनी शत्रूवर चालून जायचे ठरविले होते. त्यांनी नेताजीला फौजेनिशी तावडतोब वाईला यायचा हुकूम पाठविला होता. महाराज राजगडावरून वाईवर येणार होते.

नेताजी दोन हजार शिलेदारांनिशी निघाला. दोन हजार उमदे घोडे धुरळा उसळीत वाईकडे उधळत निघाले.

नेताजी महाराजांना जाऊन मिळाला. रणदुल्लाखान आणि बाजी

घोरपडे यांच्यावर मराठे तुटून पडले. शत्रूचा पुरा मोड झाला. तो पळत सुटला.

नेताजीच्या पराक्रमाने महाराज खूश झाले. त्यांनी त्याची पाठ थोपटली. नेताजी भरल्या मनाने चौकाला परतला.

नामदारखानाने मिऱ्या डोंगरावर स्वारी केली. साठ मैलांवरून नेताजी धावला. त्याने नामदारखानाला साफ लुटले.

बुलाखीने रतनगडावर हल्ला केला. त्याला नेताजीने पुरा मोडून काढला.

—आणि एक दिवस राजगडावरून निघालेली घोडेस्वारांची एक तुकडी चौकात नेताजीच्या घरासमोर दाखल झाली.

तुकडीच्या अधिकाऱ्याने शिवाजी महाराजांचा लखोटा मोठ्या नम्रपणाने नेताजीच्या पुढे केला.

नेताजीने लखोटा हाती घेतला, मस्तकी लावला व फोडला.

लखोटा वाचून नेताजीला आनंद झाला. कारण महाराजांनी त्याला लष्कराचा मुख्य अधिकारी– म्हणजे सरनौबत नेमले होते. त्याला राजगडावर बोलाविले होते.

त्याच दिवशी घोडदळ बरोबर घेऊन नेताजी राजगडाकडे दौडत निघाला.

# ५. घोडदौड

दुपार टळली होती.

जावळीच्या अरण्यात संध्याकाळच्या सावल्या हातपाय पसरू लागल्या होत्या. बोरी-सावरीची झाडे, साग-ऐनाचे वृक्ष, करवंदीच्या जाळ्या, वेळूची बेटे आज जागी झाली होती. ती डोळे फाडफाडून पाहात होती. वाघाच्या जंगलात दबा धरून बसणारी ही माणसे आहेत तरी कोण ?

ती शिवाजी महाराजांची माणसे होती. वाघासारखी माणसे वाघाच्या जंगलात शिरली होती. पण हालत नव्हती. बोलत नव्हती. प्रतापगडा-कडे कान लावून दबा धरून बसली होती.

याला तसेच कारण झाले होते.

विजापूरचा सरदार अफझलखान हा स्वराज्याचे प्राण हरण करायला आला होता. त्याने महाराजांचे वडील शहाजी राजे यांचा पूर्वी अपमान केला होता. तोच महाराजांचे वडील भाऊ संभाजीराजे यांच्या मृत्यूला कारण झाला होता. तो मोठा दगाबाज आणि कपटी होता. महाराज त्याची आज दुपारी प्रतापगडाच्या पायथ्याशी भेट घेणार होते. महाराजांचे प्राण धोक्यात होते.

जिजामाता राजगडावर भवानीला आळवीत बसल्या होत्या. तानाजी, कान्होजी जेधे, हैबतराव सिलीमकर, बांदल, मोरोपंत, नेताजी पालकर आणि इतर सरदार जावळीच्या अरण्यात जागोजाग सैन्यानिशी बसले

होते. प्रत्येक सरदार आणि प्रत्येक सैनिक महाराजांच्या चिंतेने चूर झाला होता.

नेताजी आपले घोडदळ घेऊन आपल्या जागी उभा होता. महाराजांचे विचार त्याच्या डोक्यात घोळत होते. त्याला आदल्या रात्रीच्या बैठकीतले महाराजांचे शेवटचे शब्द आठवले. महाराज म्हणाले होते–

" लक्षात ठेवा ! अफझलखानानं दगा केला आणि आमचं बरंवाईट झालं, तर खचून जाऊ नका. छोट्या शंभूला माझ्या जागी माना. नेताजीचा शब्द पाळा. शत्रू नष्ट करा. हे स्वराज्य व्हायलाच पाहिजे."

महाराजांनी आपल्यावर केवढा विश्वास टाकला ! केवढे आपले भाग्य थोर ! या विचारांनी नेताजीचे मन भारावून गेले.

इतक्यात प्रतापगडावर खुणेची तोफ कडाडली– धडाड धूड्डम !

अफझलखानाने महाराजांना दगा करण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे महाराजांनी त्याचा पुरा निकाल लावला, हे मावळ्यांनी ओळखले.

स्वराज्यावरचे संकट टळले. महाराज मरणाच्या मिठीतून परत आले. त्यामुळे जावळीच्या जंगलात दबा धरून बसलेले मावळे आनंदाने बेहोष झाले.

खुणेच्या तोफेचा अर्थ होता—

' उठा ! अफझलखानाच्या फौजेचा फडशा पाडा !'

मराठे सैनिक उठले. जावळीचे शांत जंगल जागे झाले. भयंकर खळबळ माजली. चारीही बाजूंनी मावळे अफझलखानाच्या तळावर धावले.

अफझलखानाची फौज खुषीत अस्ताव्यस्त पसरली होती. अफझलखानाच्या दगाबाजीवर त्यांचा विश्वास होता. तो शिवाजीची मुंडी पिरगाळील याची त्यांना खात्री होती.

—आणि महाराजांनी अफझलखानाच्या दगाबाजीवर मात केली नि त्याला जमीनदोस्त केला, हे त्यांना अजून कळले नव्हते. विजापूरचे सैनिक बेसावध होते.

इतक्यात मावळी फौजेचा लोंढा रोरावत आला. अफझलखानाच्या राहुट्या, तंबू, पाले यांना पालापाचोळ्यासारखे तुडवीत सुटला.

नेताजी संतापाने पेटला होता. तो आवेशाने शत्रूवर तुटून पडला. जणू काय रणचंडिकेने त्याच्या अंगात आज संचार केला होता.

नेताजीचे शिलेदार त्याच्या मागून धावले. मोठ्या त्वेषाने ते शत्रूवर तुटून पडले. गवत कापावे, तसे ते शत्रूला कापीत सुटले. उचल तलवार, उडव मुंडके ! दुसरी बात नहीं. शत्रूला ठेचून काढा, समोर येईल त्याला आडवा करा, हा नेताजीचा हुकूम होता. एकालाही विजापूरला जिवंत पाठवायचा नाही, या ईर्षेने शिलेदार शत्रूला कापीत चालले. भयंकर कापाकापी झाली.

अफझलखानाच्या फौजेत भयंकर हाहाकार उडाला. सगळीकडे हलकल्लोळ माजला. आकांत उडाला. अस्मानच कोसळले. तेथे कोण काय करणार ? मराठ्यांनी रणभूमीवर भयंकर तांडवनृत्य मांडले होते. कल्पांताचे भयाण वादळ सुरू झाले. प्रलयकाळ लोटला. ' या अल्ला ! यह क्या हुआ ? ' या आरोळ्यांनी ते अरण्य दणाणून गेले.

त्या कल्लोळाने अफझलखानाचे माजलेले हत्ती भयभीत झाले. बेभान होऊन त्यांनी साखळदंड तोडले आणि विजापूरच्या सैन्याचा चेदामेंदा करीत ते पळत सुटले. पळा, पळा, पळा ! पण कोठून पळायचे ? मराठ्यांनी सगळ्या वाटा रोखल्या होत्या. प्रत्येक वाटेवर शत्रूची वाट बघत हातात रक्ताळलेल्या तलवारी घेऊन मराठे उभे होते. पळायचे

म्हणजे मरायचे ! पण मागच्याला हा अनुभव सांगायला पुढला जिवंतच राहात नव्हता !

दिवस मावळला. पण मराठ्यांचा आवेश मावळला नव्हता. त्यांचे हात थांबले नव्हते. त्यांचे मन थकले नव्हते. शत्रूफौजेची कत्तल चालूच होती. लढाई म्हणतात ती हीच. शत्रूचा संपूर्ण नाश म्हणजे लढाई ! नेताजीने आपल्या शिलेदारांना हाच मंत्र शिकवला होता आणि ते तो बरोबर गिरवीत होते.

पण रात्रीचा काळोख पसरला आणि शत्रूच्या काही लोकांनी त्याचा फायदा घेतला. त्यांत पहिला होता फाझलखान. फाझलखान हा अफझलखानाचा थोरला मुलगा. बाप मरून पडला होता. दोन भावांना मराठ्यांनी जिवंत पकडले होते आणि फाझलखान आपला जीव वाचविण्यासाठी करवंदीच्या जाळीत शिरला होता.

फाझलखानाच्या मागोमाग निसटला मुसेखान. त्याच्या मागे धावला हसनखान. त्याच्या मागे याकूतखान आणि त्याच्या मागोमाग इतर दोनचार खान धावले !

त्या खानांना वाटले — पळण्यात आपण मोठी बहादुरी केली आहे. कारण आपल्याला कोणीच पाहिले नाही. शेवटी कशी जिरवली मराठ्यांची !

पण दुरून नेताजीला या पळपुट्यांच्या पाठी दिसल्या आणि पाचशे स्वार बरोबर घेऊन तो वाघासारखा अरण्यात शिरला.

जावळीच्या अरण्यात नेहमी भर दुपारीही काळोख असायचा. त्यावेळी तर रात्र पडली होती. काटेरी जाळ्या एकमेकींना लागून पसरल्या होत्या. उंच उंच झाडे एकमेकांना लागून उभी होती. पाला-पाचोळ्याचा गुडघाभर थर सगळीकडे पसरला होता. या पाचोळ्यातून जहरी नाग कोठे डोके वर काढील, हे सांगता येत नव्हते. जाळीमागे

सुस्त पडलेला वाघ किंवा चित्ता केव्हा डरकाळी फोडून उठेल, याची कल्पना करवत नव्हती. किर्रर झाडी करकरत होती. पालापाचोळा सरसरत होता. वेळूच्या बेटात भीतिदायक शीळ वाजत होती.

पण नेताजी आणि त्याच्या घोडेस्वारांना भीती हा शब्दच ठाऊक नव्हता. त्या दिवशी प्रत्यक्ष मृत्यू त्यांना भिऊन पळाला होता. मग वाघ आणि जहरी नाग त्यांच्यासमोर कसले येणार !

रानातली जाळी नि जाळी शोधीत ते निघाले. पण त्यांना हवे असलेले फाजलखान, मुसेखान, याकूतखान, हसनखान इत्यादी खान कोठे आढळले नाहीत.

—आणि ते त्यांना कसे आढळणार ? जावळीच्या चंद्रराव मोऱ्यांचा वंशज प्रतापराव मोरे हा विजापूरकरांना सामील होता. स्वतःची जहागीर वाचविण्यासाठी — नव्हे, स्वतःचे पोट जाळण्यासाठी त्याने आपले इमान शत्रूला विकले होते. स्वराज्यासाठी शीर तळहातावर घेऊन लढणाऱ्या शिवाजी महाराजांना विरोध करण्यासाठी प्रतापराव मोरे जावळीच्या रानात जिवाचे रान करीत होता. तसल्या हीन दशेतही तो फाजलखानासमोर मुजऱ्यासाठी शंभरदा वाकत होता आणि त्यांचा जीव वाचावा म्हणून एका आडवाटेने त्यांना घेऊन तो वाईकडे निघाला होता. काय म्हणावे या देशद्रोह्याला !

दिवट्यांच्या प्रकाशात बराच वेळ नेताजीने शोध केला; पण एकही खान सापडला नाही. ते दुसऱ्या वाटेने वाईकडे पसार झाले असावेत, हे त्याने ओळखले.

वाईला अफझलखानाचा मुख्य तळ होता. त्याचा जनानखाना, काही हत्ती, घोडे व खजिना तेथेच त्याच्या वाड्यावर होता.

नेताजीने घोड्याला टाच मारली आणि वाईच्या वाटेने दौडत निघाला. त्याच्या मागून त्याचे पाचशे स्वार निघाले — अंधारातून,

काळ्याकुळ्यांतून, घळीवळीतून, दरीतून, घाटातून दौडत निघाले. काळोखाला टोचीत लखलखत्या दिवट्या नाचत नाचत वाईकडे निघाल्या.

पहाटेच्या काळोखात नेताजी वाईचा घाट उतरून वाईत उतरला. त्याने अफझलखानाच्या वाड्याला वेढा घातला. तेथले हत्ती, घोडे, खजिना ताब्यात घेतला.

—आणि त्याला कळले, की फाझलखान तेथला जनानखाना घेऊन रातोरात विजापुराकडे पळाला.

अरेरे ! चुकले ! आपल्याला उशीर झाला. काळसर्प आपल्या तावडीतून निसटला. अजून तो सापडेल, असे नेताजीला वाटले.

लगेच नेताजीने घोड्यावर उडी टाकली. भराभर पाचशे स्वार घोड्यांवर चढले आणि ते सगळे विजापूरच्या वाटेने दौडत निघाले. पाठीवरच्या स्वारांचा आवेश घोड्यातही संचरला होता. ते वाऱ्याबरोबर स्पर्धा करीत धावत होते. त्यांनी खूप मजल मारली. पण वाटेत चिट-पाखरूही आढळले नाही.

या वेळपर्यंत फाजलखान आणि त्याचा लवाजमा खूप दूर निघून गेला होता.

शेवटी नेताजी मागे फिरला. तो परत वाईला आला आणि वाईत येताच तो आश्चर्याने थक्क झाला.

कारण शिवाजी महाराज केव्हाच वाईत येऊन थडकले होते.

नेताजीच्या पराक्रमावर महाराज आज फारच खूश झाले होते. अफझलखानाच्या मृत्यूने विजापूरला महाराजांनी मोठा धक्का दिला होता. आणखी एक जबरदस्त तडाखा देण्यासाठी ते वाईला आले होते. यावेळी शत्रूला पुरा गाडून टाकायचा, असा विचार महाराजांनी केला होता.

महाराजांनी आपला विचार नेताजीला सांगितला. महाराजांच्या हुकुमाप्रमाणे नेताजी विजापुराकडे निघाला. त्याच्या मागे पाचशे घोडेस्वार नव्या दमाने दौडत निघाले.

नेताजी विजापूरच्या प्रदेशात घुसला. त्याच्या घोड्यांच्या टापांनी आदिलशाही हादरून गेली. असा आवेश, असा त्वेष, अशी त्वरा त्या भूमीने कधी पाहिली नव्हती. 'नेताजी आला, आला!' ही आरोळी हवेत निघते न निघते, तोच लुटालूट करून 'नेताजी गेला, गेला!' ही आरोळी हवेत उठत होती. गरुडझेपीसारख्या शहराशहरांवर उड्या टाकीत नेताजी पुढेपुढे चालला होता. शत्रूच्या हृदयावर थयथय नाचत घोडेस्वार दौडत होते. असा तडाखा आदिलशाहीच्या तख्ताला कधीच बसला नव्हता. क्षणात जंगलच्या जंगल जाळून टाकणाऱ्या विजेचा हलकल्लोळ, क्षणात शहरच्या शहर गिळणाऱ्या धरणीकंपाचा तडाखा.



क्षणात लाव्हारसात भूभाग जाळून टाकणाऱ्या ज्वालामुखीचा क्रोध. क्षणात बेटच्या बेट एकाच लाटेच्या घोटात गिळून टाकणाऱ्या

सागराचा संताप. या सगळ्यांचा अनुभव विजापूरला आज चाखायला मिळाला. अफझलखानाच्या दगाबाजीचा हा परिणाम होता !

नेताजीने गदग लुटले, तिकोटे लुटले, हुकेरी लुटली, गोकाक लुटले, लक्ष्मेश्वरही लुटले ! ती प्रचंड लूट घेऊन तो कोल्हापूरकडे दौडत निघाला आणि पन्हाळगडावर जाऊन त्याने ती लक्ष्मी शिवाजी-महाराजांच्या चरणांवर अर्पण केली.

खूश होऊन महाराजांनी नेताजीची पाठ थोपटली.

## ६. घोर निराशा

निधड्या छातीचा नेताजी घोर निराशेने शिवापट्टणकडे चालला होता.

अफझलखानाचा वध झाल्यावर शिवाजी महाराजांनी विजापूरचा मुलूख आणि पन्हाळगड, विशाळगड यांसारखे बळकट गड जिंकले होते. गेल्या वर्षात नेताजीने जयावर जय मिळविले होते.

पण विजापूरने अफझलखानाच्या वधाचा सूड घ्यायचे ठरवले. सिद्दी जौहर या मातबर सरदाराला स्वराज्यावर धाडले. महाराज पन्हाळगडावर होते. सिद्दी जौहरने चाळीस हजार फौजेनिशी पन्हाळगडाला वेढा घातला. महाराजांना गडात कोंडले.

त्याच वेळी औरंगजेबाने दोन लाख फौज देऊन शाइस्ताखानाला पुण्यावर पाठविले.

–आणि त्याच वेळी विजापूरने कुतुबशहाची फौज मराठ्यांशी लढण्यासाठी विजापुरात आणून ठेविली.

स्वराज्यावर आकाश कोसळले होते. शिवाजी महाराजांचे प्राण भयंकर धोक्यात होते !

आता स्वराज्याला वाचवायचे कोणी ? महाराजांना काळाच्या दाढेतून सोडावावयाचे कोणी ?

नेताजी पालकर महाराजांचा सरनौबत. त्याचेच हे काम. पण तो विचारात पडला.

पण हे काम सोपे नव्हते. अगोदर सिद्दी जौहरला तोंड द्यावे, की अगोदर शाइस्ताखानाला तोंड द्यावे ? दोघांच्याही फौजा अफाट. काय करावे ? त्यात सिद्दी जौहरच्या मदतीला राजापूरकर इंग्रज आपल्या तोफा घेऊन आले होते. सिद्दी जौहरचा वेढा अभेद्य झाला होता. केवळ तीन हजार मावळे महाराजांजवळ पन्हाळगडावर होते. तीन हजारांनी चाळीस हजारांचा वेढा फोडायचा कसा ?

आता काय करावे ? आता काय करावे ? पेच सुटत नव्हता. विचार करता करता डोके फुटून जायची वेळ आली.

शेवटी नेताजीने ठरविले–अगोदर महाराजांची वेढ्यातून सुटका करायची. पण कशी ? सिद्दी जौहरचा वेढा फोडणे केवळ अशक्य होते. मग....मग ? बस्स ! ठरले ! गनिमी कावा लढवायचा. नाक दाबल्यावर तोंड उघडेलच. विजापूरवरच स्वारी करायची. मग विजापूर वाचवायला सिद्दी जौहर धावत येईल. पन्हाळगडाचा त्याचा वेढा आपोआप उठेल. महाराज मोकळे होतील !

नेताजीने सिद्दी हिलाल या महाराजांच्या सरदाराला बरोबर घेतले. पाचशे घोडेस्वारांनिशी नेताजी विजापुराकडे दौडत निघाला.

ही बातमी विजापूरच्या दरबाराला लागली. विजापुराने खवास-

खानाला नेताजीच्या बंदोबस्ताला धाडले. कुतुबशहाची फौज मदतीला घेऊन खवासखान विजापुराबाहेर पडला. कारण नेताजीने विजापुरात पाऊल टाकले, तर विजापूरचे तक्त जाग्यावर राहाणार नाही, हे तो ओळखून होता.

खवासखानाच्या प्रचंड फौजेने नेताजीला वाटेतच अडविले. तुंबळ युद्ध झाले. कोण कोणाला हटेना. एकदा नेताजीला वाटले, खवासखानाची फळी फोडावी, विजापुरात घुसावे आणि आदिलशाही तख्त जमीनदोस्त करावे, पण फौज तोकडी पडली. नेताजीला माघार घ्यावी लागली. घोर निराशेने तो मागे फिरला.

आता उपाय काय ?

घोर निराशेने नेताजी शिवापट्टणला जिजामाता आईसाहेबांकडे चालला होता. सल्ल्यासाठी ! महाराजांची सुटका कोणत्या उपायाने करावी, हे विचारण्यासाठी !

नेताजी शिवापट्टणला पोचला आणि आईसाहेब राजगडावर गेल्या, असे त्याला कळले.

नेताजी त्याच पावली राजगडाकडे दौडत निघाला.

आईसाहेबांना मुजरा करून बोलण्यासाठी नेताजीने तोंड उघडले. पण आईसाहेबांचा चेहरा पाहून उघडलेले तोंड त्याने तसेच मिटले. आईसाहेब रागावल्या होत्या. भयंकर रागावल्या होत्या. महाराज वेढ्यात सापडून कित्येक दिवस झाले तरी नेताजीने त्यांना सोडविण्याचा काहीच उपाय केला नाही, म्हणून त्या रागावल्या होत्या. पन्हाळगडातून महाराजांना सोडवायला आता त्या स्वतःच फौज घेऊन निघणार होत्या !

आईसाहेबांचे बोलणे ऐकून नेताजीने खाली मान घातली. त्याने

आईसाहेबांचे पाय धरले आणि लगेच पन्हाळगडाकडे जाण्याची परवानगी मागितली.

पण नेताजी आणि त्याची फौज थकून आली होती. आईसाहेबांनी त्याला त्या दिवशी विश्रांती घ्यायला सांगितले.

राजगडाच्या बालेकिल्ल्याच्या बाजूच्या कोठडीत नेताजी नेहमी-प्रमाणे उतरला. महाराजांनी आपल्या सरदारांसाठी या कोठड्या मुद्दाम बांधून घेतल्या होत्या. महाराजांना भेटायला आले, की तानाजी, सिलीमकर आणि नेताजी याच कोठ्यांत उतरत.

दुसऱ्या दिवशी आईसाहेबांना मुजरा करून नेताजी राजगडावरून उतरला. सिद्दी हिलाल आणि त्याचा मुलगा वाहवाह यांना नेताजीने बरोबर घेतले.

पाच हजार घोडेस्वार पन्हाळगडाच्या रोखाने दौडत निघाले.

नेताजी येत आहे, ही बातमी लागताच सिद्दी जौहर सावध झाला. तो मोठा चतुर सेनापती होता. नेताजी शिवाजीला सोडवायला येत आहे, हे त्याने ओळखले. लढाई सुरू झाली, की नेताजी आपला वेढा फोडणार, गडावर शिवाजी त्याच्याशी हातमिळवणी करणार आणि शिवाजी आपल्या हातांतून निसटणार, याचा त्याला अंदाज आला.

सिद्दी जौहरने नेताजीला गडाजवळ येऊच द्यायचे नाही, असे ठरविले. त्याच्यावर पाठविण्यासाठी त्याने आपली फौज बाजूला काढली. वेढ्याचा पुरा बंदोबस्त केला.

सिद्दी जौहरच्या फौजेने नेताजीला वाटेतच गाठले.

पन्हाळगडाच्या तटावरून शिवाजी महाराजांनी दोन्ही फौजा एक-मेकींना भिडलेल्या पाहिल्या.

लढाईला तोंड लागले. कापाकापीला सुरुवात झाली. शत्रूची फळी फोडण्याची नेताजीने पराकाष्ठा केली. फळी थोडी फुटलीसुद्धा.

इतक्यात सिद्दी हिलालचा मुलगा लढाईत ठार झाला. नेताजीच्या फौजेत एकच गोंधळ उडाला. शत्रूला हुरूप चढला होता. तो मराठ्यांवर तुटून पडला. मावळे पडू लागले. भयंकर नाश डोळ्यांसमोर दिसू लागला. नेताजीने माघार घेतली. मराठी फौज आल्या वाटेने पळू लागली.

निराशा ! घोर निराशा ! !

## ७. उंबरखिंडीतील पराक्रम

शेवटी शिवाजी महाराजांनी आपल्या अजोड युक्तीने सिद्दी जौहरच्या वेढ्यातून सुटका करून घेतली.

सहा महिने लोटले.

सिद्दी जौहर, फाजलखान, सिद्दी मसूदखान, सुर्वे, दळवी वगैरे विजापूरचे सरदार फजीत होऊन निघून गेले होते.

पण शाइस्ताखान दोन लाख फौज घेऊन पुण्यात बसला होता. खुद्द महाराजांच्याच लाल महालात !

शाइस्ताखान आपल्या सरदारांबरोबर शिवाजी महाराजांचा सर्वनाश करण्याचे मनसुबे रचीत होता.

शेवटी त्याने महाराजांचे कोकण काबीज करण्याचा बेत पक्का केला. कोकण जिंकावे, महाराजांचे आरमार बुडवावे आणि मावळे नि गड जिंकावे, असा त्याचा मनसुबा होता.

शिवाजीशी शिवाजीच्या पद्धतीने लढायचे. कोकण गनिमी काव्याने घ्यायचे, असेही त्याने ठरविले.

कोकणावर कोणत्या मार्गाने स्वारी करायची, हे त्याने गुपित ठेविले. त्याचा हा मार्ग कोणालाही कळणार नाही, याची त्याला खात्री होती.

कोकणस्वारीचा तो मार्ग खरोखर अवघड होता. पुणे, तळेगाव, वडगाव, मळवली या मार्गाने तुंगारण्य गाठायचे. तेथून सह्याद्री चढायचा. मग आंबेनळीच्या वाटेने उंबरखिंडीतून खालच्या अरण्यात उतरायचे. मग पाली, नागोठणे, कल्याण, भिवंडी ही शिवाजीची ठाणी जिंकायची.

या मार्गात डोंगराचे कडे उभे होते. दऱ्या आ वासून गिळायला टपल्या होता. दाट जंगले किरकिरत होती. माणसांची वसती अगदी नव्हती. पाण्याचे टिपूस आढळणार नव्हते.

पण शिवाजीला बुडवायचाच, असा निर्धार शाइस्ताखानाने केला होता.

या स्वारीसाठी त्याने कारतलबखान या पराक्रमी पठाण सेनापतीची नेमणूक केली. त्याच्याबरोबर मित्रसेन, अमरसिंह, कछप वगैरे उत्तर हिंदुस्थानी सरदार दिले. तसेच चव्हाण, गाढे, कोकाटे, जाधव हे मराठे सरदार दिले. सेनापती रायबागीण हिलाही कारतलबखानाबरोबर धाडले.

मोठमोठ्या तोफा, मोठा खजिना, हत्ती, घोडे, उंट, सामानसुमान यांनिशी सज्ज असलेली मोठी फौज घेऊन कारतलबखान निघाला.

खान अगदी गुपचूप निघाला. हां हां म्हणता कोकण काबीज करू अशी त्याला घमेंड होती. पण सह्याद्री चढताना त्याची फौज मेटाकुटीला आली. अवजड तोफा डोंगरावर चढता चढेनात. हत्ती, उंट नि घोडे लटपटू लागले. आंबेनळीच्या वाटेतून एका वेळी एकच शिपाई चालू शकत होता.

कारतलबखानाने आपला बेत गुप्त ठेवला होता. पण महाराजांच्या चतुर हेरांनी बारीकसारीक सगळी माहिती राजगडावर आणली.

महाराजांनी नेताजीला बोलावले आणि चढाईचा बेत आखला.

महाराज, नेताजी आणि घोडेस्वार राजगडावरून उतरले. दुसऱ्या वाटेने ते कारतलबखानाच्या अगोदरच उंबरखिंडीच्या अरण्यात जाऊन पोचले.

त्या तुफान अरण्यात महाराजांचे घोडेस्वार जागजागी लपून बसले.

सकाळ झाली. कारतलबखानाची फौज उंबरखिंड उतरू लागली. गेल्या दोन दिवसांत त्यांना पाण्याचा एक थेंब मिळाला नव्हता. पायथ्याच्या अरण्यात कोठेतरी एखादे डबके आढळेल, अशी शिपायांना आशा होती. तहानेने व्याकुळ झालेली मोगली फौज सकाळच्या कोवळ्या किरणांत दाट अरण्यात उतरली.

मोगली फौज पुढे पुढे चालली. जसजसे पुढे जावे, तसतसे अरण्य अधिकाधिक दाट होत चालले होते. अजून पाण्याचे टिपूसही दिसले नव्हते. घशाला कोरड पडली होती.

कारतलबखानाची फौज अरण्याच्या अगदी गाभ्यात आली.

—आणि दाट झाडीत कोठेतरी रणशिंग वाजले. त्या तुफान अरण्यात रणशिंगाचा आवाज भयंकर भेसूर भासला.

रणशिंगाचा आवाज ऐकून मोगली फौज चपापली. कारतलबखान आणि त्याचे सरदार मनात चरकले. फौजेच्या काळजाने ठाव सोडला. कारण वाटेच्या श्रमांनी आणि तहानेने फौज आधीच हैराण झाली होती.

इतक्यात मोगली फौजेच्या तोंडासमोरच्या दाट झाडीतून सूसू करीत शेकडो बाण आले. त्यामागून दुसरी फैर – मग तिसरी फैर !

एका क्षणात कारतलबखानाचे शेकडो सैनिक कोसळले. त्यांच्या आर्त किंकाळ्यांनी ते तुफान अरण्य किंचाळून उठले.

इतक्यात मोगली फौजेच्या डाव्या व उजव्या बाजूच्या दाट झाडीत सरसर आवाज झाला. शेकडो मराठे घोडेस्वार क्षणात बाहेर आले. त्यांनी मोगली फौजेच्या दोन्ही बगलांवर हल्ला केला. आणखी शेकडो मोगल कोसळले. तलवारी म्यानांबाहेर काढायलाही त्यांना सवड मिळाली नाही.

इतक्यात 'नेताजी आला ! नेताजी आला !' ही आरोळी उठली.

मोगली फौज गर्भगळित झाली. इकडे तिकडे फाकली. मराठ्यांना चांगली संधी मिळाली. त्यांनी कापाकापीचा सपाटा लावला.

नेताजीला जावळीच्या अरण्यात केलेल्या कापाकापीची याद आली. आणि तो ओरडला,

"हाणा, कापा ! एकालाही जिवंत सोडू नका !"

सरनौबताचे हे उत्तेजक शब्द कानी पडताच मराठ्यांना चेव आला. मोगलांची एकेक तुकडी दाट झाडीत चेपायला आणि कापायला – त्यांना अवसान चढले. जिथे पाहावे, तिथे कारतलबला आपल्या फौजेची लांडगेतोड दिसू लागली.

पण कारतलबखान कोकण जिंकायला आला होता. तो माघार कशी घेणार ? अजून तो आपली फौज मोठी आहे या कैफात होता. मोगलांच्या आक्राळविक्राळ तोफा त्याच्या नजरेसमोर होत्या.

पण त्याची प्रचंड फौज कोसळत होती आणि अवजड तोफा अरण्यात पडून राहिल्या होत्या.

इतक्यात मराठ्यांच्या छोट्या तोफांचे गोळे मोगल फौजेच्या डोक्यावर आदळले. हाहाकार उडाला !

सूर्य डोकीवर आला होता.

आधीच मोगली फौज तहानेने व्याकुळ झाली होती. त्यात उन्हाचा

प्रखर मारा. दाट झाडीतून मराठ्यांचा तीव्र हल्ला. यामुळे मोगली फौजेची वाताहत होत होती.

रायबागिणीला तो नाश पाहवेना. तिने मराठ्यांशी तह करावा, असे कारतलबखानाला सुचविले.

पण कारतलब म्हणजे केवढा शूर सेनानी ! तो झटकन म्हणाला, "रायबागन, यह हरगिज नहीं करेंगे । मरगट्टोंके सामने हम सर नहीं झुकायेंगे । हम लडेंगे । हम जीतेंगे । सिपाही, मेरे बहादूर ! आगे बढो । लडो लडो — आखिरतक लडो ।"

पण मोगली फौज नामोहरम झाली होती. उभे राहायला शिपायांच्या पायांत त्राण नव्हते ! मग लढणार काय ? कपाळ ! लढायचे म्हणजे मरायचे ! बाकी लढाईला त्यांच्या दृष्टीने आता काहीच अर्थ उरला नव्हता. मराठ्यांच्या हातून आज आपला एकही शिपाई जिवंत सुटणार नाही, याची मोगली फौजेला खात्री होऊन चुकली होती !

कारण कडबा कापावा, तसे मराठे मोगलांना कापीत होते. पण मोगलसेना पडली अफाट. ती कापता कापता सरत नव्हती.

रायबागिणीला कारतलबखानाच्या मूर्खपणाचा राग आला. पण ती काय करणार ? कारण कारतलबखान सरसेनापती होता.

तिने पुन्हा कारतलबला तह करण्याची सूचना केली.

"नहीं, हरगिज नहीं ! हम वापस लौटेंगे ।"

पण परत मागे जायला मराठ्यांनी जागाच कोठे ठेवली होती ?

इतक्यात कारतलबखानाला त्याच्या एका सरदाराने येऊन सांगितले, "हुजूर ! खुद सिवाजी हमारे पीछे फौज लेकर खड़ा है !"

ऑं ! म्हणजे काय ! शिवाजी स्वतः लढाईला आला आहे ? आमचे

नवाब शाइस्ताखान पुण्याला लाल महालात हुक्का पीत आरामात पडले आहेत ! छे, छे ! या शिवाजीला लढाई कशी खेळावी, हे कळतच नाही !

आपण कसे मरणाच्या जबड्यात उभे आहोत, हे कारतलबखान-साहेबांच्या लक्षात आले ! शिवाजी ही काय भयंकर चीज आहे, हे त्याला आता समजून चुकले.

पण आता काय उपाय करावा ?

कारतलबखान भर उन्हात डोके खाजवीत होता.

इकडे नेताजी मोगली फौजेला कापीत होता.

तिकडे मोगली फौजेची परत जाण्याची वाट अडवून शिवाजी महाराज खिंडीच्या तोंडाशी घोड्यावर बसून खालची लढाई पहात होते.

महाराज पांढऱ्या घोड्यावर बसले होते. त्यांच्या अंगात जाळीदार चिलखत होते. पाठीवर ढाल होती. तसेच बाणांचा भाता होता. डाव्या खांद्याला धनुष्य लटकत होते. डोकीवर पोलादी शिरस्त्राण होते. शिरस्त्राणाचे भाल्यासारखे टोक दुपारच्या उन्हात चकाकत होते.

महाराजांच्या सभोवती त्यांचे निवडक घोडेस्वार महाराजांच्या हुकुमाची वाट पहात उभे होते.

शेवटी कारतलबखानाने निमूटपणाने रायबागिणीचे म्हणणे मान्य केले. त्याने आपला वकील तहाचे बोलणे करण्यासाठी शिवाजी महाराजांकडे पाठविला.

पांढरे निशाण फडकवीत खानाचा वकील महाराज जेथे उभे होते, तेथे निघाला.

महाराजांनी त्याला जवळ यायला परवानगी दिली.

याचना करून कारतलबखानाचा वकील म्हणाला,

" महाराज, गेल्या दोन दिवसांत आमच्या फौजेला अन्न मिळालं नाही. पाणीही मिळालं नाही. या भयंकर अरण्यात आमची फौज हैराण झाली आहे. फौज शरण आली आहे. दया करा आणि आम्हांला परत जायला वाट द्या ! " वकील अगदी गयावया करून बोलत होता.

" तुम्हांला परत जायला मिळेल. पण तुमचे हत्ती, घोडे, उंट, खजिना आधी माझ्यासमोर हजर करा, तसंच प्रत्येक सरदारानं खंडणी दिली पाहिजे. "

" सगळं कबूल ! "

महाराजांनी नेताजीला लढाई थांबविण्याचा हुकूम दिला. लढाई थांबली.

मोगलांचे उंची सामानसुमान महाराजांच्या समोर जमा होऊ लागले. खजिन्याचे पेटारे आले, हिऱ्यामाणकांच्या पेट्या आल्या. खंडणीच्या थैल्या आल्या. हत्ती, घोडे, उंट ठाणबंद झाले. तोफा हात जोडून जागच्या जागी राहिल्या.

मोगल फौजेने तलवारी म्यानांत घातल्या आणि खाली मान घालून रिकाम्या हाताने कारतलबखान, त्याचे सरदार आणि फौज आल्या वाटेने निघून गेली.

नेताजीने पराक्रमाची कमाल केली होती. महाराजांनी त्याची पाठ थोपटली. ज्यांनी ज्यांनी शौर्य गाजवले, त्यांना त्यांना शाबासकी दिली.

नेताजीला खिंड राखायचे काम नेमून दिले. कारण मोगल परत येण्याचा संभव होता.

—आणि महाराज थोडी फौज बरोबर घेऊन पुढल्या स्वारीवर निघाले.

# ८. दुर्दैवाचा फेरा

स्वराज्यावर पुन्हा भयंकर संकट कोसळले.

शिवाजी महाराजांनी शाइस्ताखानाची बोटे छाटली. सुरत आणि इतर मोगली शहरे लुटली. त्यामुळे औरंगजेब चिडला. त्याने जयसिंग आणि दिलेरखान यांना स्वराज्य नष्ट करण्यासाठी पाठविले. पाच लाख फौज, प्रचंड तोफा आणि अमाप खजिना घेऊन ते स्वराज्यावर चालून आले.

पुरंदरगडाला दिलेरखानाने वेढा घातला. मुरारबाजीने शर्थीने गड लढविला. नेताजीने दाऊतखानाचा वेढाच फोडला. मुरारबाजी गड लढवताना महापराक्रम करून धारातीर्थी पडला.

महाराजांची फौज लहान होती. आपली लाखमोलाची माणसे उगीच मरावी, हे महाराजांना नको होते. त्यांनी जयसिंगाशी तह केला. गड व मुलूख त्याला दिला आणि विजापूरविरुद्ध लढाईत त्याला साहाय्य करायचे आश्वासन दिले.

महाराजांनी जयसिंगाला विजापूरचा काही मुलूख जिंकून दिला. विजापूरच्या ताब्यातील पन्हाळगड जिंकून देण्यासाठी महाराज पन्हाळगडाकडे निघाले. त्यांनी पन्हाळगडाच्या स्वारीत येण्यासाठी नेताजीला हुकूम पाठविला.

पण महाराज पन्हाळगडाच्या पायथ्याला पोचले तरी नेताजी आपल्या फौजेनिशी आला नव्हता. पन्हाळगडाच्या लढाईत महाराजांचे सैनिक पडले. नेताजीच्या न येण्यामुळे हा अनर्थ घडला होता.

महाराजांना नेताजीचा भयंकर संताप आला. ते त्या रागातच विशाळगडावर पोचले.

नेताजी पालकर म्हणजे साधासुधा शिपाई नव्हता, की महाराजांनी त्याच्या कामचुकारपणाकडे दुर्लक्ष करावे. नेताजी सरसेनापती होता. सरसेनापतीने शिस्त पाळली नाही, तर सैनिक शिस्तीचा मुलाहिजा काय ठेवणार ?

महाराजांची शिस्त अत्यंत कडक. या शिस्तीमुळेच स्वराज्याचे बी रुजले, रोपटे जोपासले गेले आणि शेवटी त्याचे झाड झाले. त्याचा अजून विशालवृक्ष व्हायचा होता.

ज्या नेताजीला मोठ्या पदावर चढवले, सरसेनापती नेमले, विश्वास टाकला, त्याने असा दगा द्यावा, हे महाराजांना रुचले नाही.

महाराजांना एकदम एक गोष्ट आठवली. नेताजीने काही दिवसांपूर्वी पन्हाळगडाची किल्लेदारी आपल्या मेहुण्याला द्यावी, अशी रदबदली केली होती. आपण ती साफ नाकारली. स्वराज्यात गुणाला महत्त्व आहे, वशिल्याला नाही. म्हणून का नेताजी पन्हाळगडावरच्या स्वारीत वेळेवर आला नाही ?

छे ! छे ! हे सगळ्यांत वाईट. सरसेनापतीच अशी वशिलेबाजी करू लागला, तर सामान्य माणसांनी काय करावे ? असा माणूस स्वराज्याचा सरसेनापती व्हायला नालायक आहे.

विशाळगडाच्या सदरेवर महाराज बसले होते. रागाने त्यांचा चेहरा लालबुंद झाला होता.

इतक्यात नेताजी आला. त्याने मुजरा केला आणि महाराजांकडे पाहिले.

महाराजांच्या डोळ्यांत राग मावत नव्हता. अंगार पेटला होता. त्यांच्या डोळ्यांत कोटी सूर्यांची आग नेताजीला दिसली.

नेताजीची हिंमत सिंहाची. पण त्याला महाराजांच्या चेहऱ्याकडे पाहाण्याचे धैर्य होईना. आता आपला टकमक टोकावरून कडेलोट होणार, याची त्याला खात्री होऊन चुकली !

—आणि महाराज गरजले,

" तुमची सरनौबती काढून घेतली आहे ! आम्ही तुम्हांला बडतर्फ केलं आहे ! "



नेताजी जणू काय या हुकमाचीच वाट पाहात होता. तो हलला—वळला – निघाला – गेला – पळाला ! होय पळाला. थेट विजापुराला पळाला. विजापूरकरांच्या चाकरीला राहिला. विजापूरच्या दरबारने नेताजीला चार लाख रुपये बक्षीस दिले, जहागीर दिली. तो आता विजापूरच्या बाजूने मोगलांशी लढू लागला.

जयसिंगाने नेताजीला आता बरोबर ओळखले. त्याने आपले जाळे

त्याच्याभोवती टाकले. नेताजी जाळ्यात अडकला. विजापूरची चाकरी सोडून तो मोगलांना मिळाला. जयसिंगाने त्याला दोन लाख रुपये रोख दिले आणि औरंगजेबाकडून त्याला पंचहजारी सरदारकी देववली.

मधल्या काळात शिवाजी महाराज औरंगजेबाला भेटायला आग्र्याला गेले, कैदेत सापडले आणि स्वतःची सुटका करून, सहीसलामत निघालेही !

त्यामुळे औरंगजेब चिडला. त्याने जयसिंग आणि दिलेरखान यांना फर्मान पाठविले, की नेताजीला कैद करून दिल्लीला पाठवा.

संध्याकाळची वेळ होती. मोगल छावणीतल्या आपल्या तंबूत नेताजी बसला होता. सूर्याची किरणे तंबूच्या पश्चिमेकडील दारात रेंगाळत होती.

बसल्या बसल्या नेताजीला पूर्वीचे दिवस आठवले. आपल्या पराक्रमाने आपण सरनौबत झालो होतो, याचा त्याला अभिमान वाटला. आपण खरोखरच फार शूर आहोत. उगीच नाही विजापूर दरबारने आपल्याला जहागीर दिली ! आणि आपण कर्तबगार नसतो, तर औरंगजेबाने आपल्याला पंचहजारी का नेमले असते ?

त्याचे लक्ष आरशाकडे गेले. स्वतःचे प्रतिबिंब पाहून तो खूश झाला. स्वतःशीच हसला.

इतक्यांत तंबूच्या दारावर टाळी वाजल्याचा आवाज नेताजीला ऐकू आला. त्याने चटकन मान वळविली. दाराची कनात वर करून दिलेरखान आत येत होता.

नेताजी झटकन उठला. कमरेपासून लवून त्याने दिलेरखानाला मुजरा केला.

दिलेरखानामागोमाग दहाबारा पठाण सैनिक तंबूत शिरले.

"जल्दी करो, पकडो इसको!" दिलेरखानाने हुकूम सोडला.

नेताजीला काय चालले आहे, हेच कळेना! तो दिलेरखानाच्या तोंडाकडे पाहातच राहिला.

'पाहा, नेताजी पाहा! तुझ्या पराक्रमावर मोगल कसे खूश आहेत ते!'

दिलेरखानाच्या हुकुमाप्रमाणे शिपायांनी नेताजीला पकडले. त्याच्या हातापायांत साखळदंड घातले. नेताजी कैद झाला. दिलेरखानाचा कैदी झाला!

दिलेरखानाने इशारा करताच शिपायांनी नेताजीला तंबूच्या बाहेर खेचले. तो बाहेर जाताच मोगली छावणीतील हजारो शिपाई आपल्याकडे पाहात आहेत, हे त्याने बघितले. त्याने शरमेने मान खाली घातली.

थोड्या अंतरावर एक गाडी उभी होती. दिलेरखानाच्या मागून पठाणांनी नेताजीला गाडीकडे नेले. त्याला गाडीत ढकलले. गाडीच्या खिडक्या लागल्या.

औरंगजेबाच्या हुकुमाप्रमाणे नेताजीला दिल्लीला पाठवायची व्यवस्था दिलेरखानाने बरोबर केली.

नेताजीला दिल्लीला नेण्याच्या कामगिरीवर दिलेरखानाने एक अधिकारी नेमला आणि पाचशे पठाणांच्या पहाऱ्यात नेताजीची दिल्लीला रवानगी केली.

गाडी हलली. नेताजी दिल्लीला निघाला.

# ९. अरेरे ! नेताजी !

शेवटी नेताजीची गाडी दिल्लीला पोचली.

त्याला औरंगजेबासमोर उभे केले. त्याला महाराजांच्या दरबाराची आठवण झाली. तेथला मानसन्मान डोळ्यांसमोर उभा राहिला आणि काळजात खोल कोठेतरी कळ उठली. नेताजीने डोळे मिटून घेतले.



इतक्यात बादशहाला कुर्निसात करण्याची शिपायाने त्याला याद दिली. नेताजी वाकला– अगदी कमरेपासून वाकला. वर मान करता करता महाराजांपुढे केलेल्या मुजऱ्याची त्याला आठवण झाली. महाराजांना मुजरा करताना हृदय उचंबळून येत होते !

नेताजीने मसनदीवर बसलेल्या औरंगजेबाकडे पाहिले आणि महाराजांचा तेजस्वी चेहरा त्याच्या मनापुढे उभा राहिला. आता पुन्हा कधीतरी मला तो चेहरा दिसेल का या जन्मात? औरंगजेब आपल्याकडे तुच्छतेने पाहात आहे, हे नेताजीच्या लक्षात आले! तो मनात दुखावला; पण आता काय उपयोग होता अशा हळुवारपणाचा? नेताजीने असहायतेने मान खाली घातली. त्याचे मन आक्रोश करीत उठले–

'नेताजी, कोठे आहे तुझे सामर्थ्य?'

औरंगजेबाला वेळ कोठे होता नेताजीची चौकशी करायला! त्याने केवळ इशारा केला आणि त्याला फिदाईखानाच्या ताब्यात दिले.

'याला बाटवा!' असाही त्याने हुकूम दिला.



फिदाईखानाने त्याला पोलादखानाच्या हाती दिले. 'शिवाजीसारखा हा पळून जाणार नाही, याची काळजी घे' असे सांगायला तो विसरला नाही. 'नेताजी पळाला, तर बादशाहा तुझे नि माझे मुंडकेच उडवील, याद राख!' असेही त्याने पोलादखानाला सांगितले.

पोलादखानाने नेताजीला एका अंधाऱ्या कोठडीत बंद केले! अरेरे! नेताजी!!

त्या रात्री त्या अंधाऱ्या कोठडीत नेताजीला ब्रह्मांड आठवले. मधून मधून त्याच्या हातापांयातले साखळदंड खळखळत होते. तो आवाज ऐकून त्याच्या मनाला यातना होत होत्या. त्याचे मन कढत होते – कुढत होते.

शिवाजी महाराज औरंगजेबाच्या कैदेतून सहीसलामत सुटून गेले. या गोष्टीचे नेताजीला आता महत्त्व कळले. 'महाराज खरोखरीच अवतारी पुरुष! अशा पुरुषोत्तमाने मला आपला उजवा हात मानले. अफझलखानाच्या भेटीला जाताना स्वराज्याची जबाबदारी महाराजांनी माझ्यावर सोपविली होती. मला स्वराज्याचा सरनौबत नेमले होते. विजापूर नी मोगल मला प्रतिशिवाजी समजत होते. आणि .... आज कोठे आहे माझे सामर्थ्य! महाराज, मला सामर्थ्य लाभले होते तुमच्यामुळे! पण मी अभागी! मला हे कळले नाही. मला गर्व झाला माझ्या पराक्रमाचा. माझा गर्व खोटा होता. धन्य बाजी प्रभू देशपांडे! धन्य मुरारबाजी देशपांडे! ही शत्रूकडची माणसं होती. महाराज, तुम्ही त्यांना पदरी घेतलेत. त्यांनी तुम्हांला खरंखरं ओळखलं. तुमच्यासाठी त्यांनी आपले जीव कुर्बान केले. ते अमर झाले! आणि मी .... मी कृतघ्न झालो. महाराज, तुम्ही माझ्यावर रागावलात, ते बरोबर होतं. पण मी माझ्या घमेंडीत गेलो. तुमची क्षमा मागतो, तर तुम्ही मला क्षमा केली असती. पण पराक्रमाचा कैफ चढला होता मला. कोठे आहे पराक्रम माझा? महाराज! महाराज! आता या जन्मात तुमचं दर्शन होणं नाही! अरेरे! नेताजी, काय केलंस तू हे?

'खंडोबाच्या पालीहून आम्ही पलायन केलं, याचा मला विसर पडला.

चौकातल्या मारुतीच्या उपासनेचा मला विसर पडला ! सरनौबत झालो आणि मी काष्टी–तांदळी गावच्या भव्य वाड्यात राहायला आलो, याचा मला विसर पडला. महाराज, आज तुमचा लाडका नेताजी पश्चात्तापानं जळतो आहे ! पण .... पण ... अरेरे ! नेताजी तू कोण होतास आणि कोणत्या दशेला येऊन पोचलास ?'

सकाळ झाली. सूर्य हसत हसत आकाशात वर आला. त्याच्या कोवळ्या किरणांनी चराचराला कुरवाळले. दिल्लीचा कोपरा न कोपरा उजळला. मोगली वैभव लखलखले.

नेताजीच्या कोठडीत मात्र रात्रीसारखा काळोखच भरून राहिला होता. रात्रभर त्याचा डोळ्याला डोळा लागला नव्हता. तो रात्रभर त्या भयाण काळोखात तडफडत होता, तळमळत होता, कळवळत होता.

सकाळ झाली, हे नेताजीने अंदाजाने ओळखले. त्याचे मन आक्रोश करू लागले.

'नेताजी, तुला आता सूर्यप्रकाशही दिसणार नाही. सामान्य माणसाला मिळणारे स्वातंत्र्यही तुला आता लाभणार नाही. हा अंधार हाच तुझा आता जन्माचा सोबती ! या कोठडीचे चिरे आणि दगड हेच तुला साथ करतील आता यापुढे. चौक गावचे तुझे पाठीराखे आता तुझ्या मागे येणार नाहीत. प्रत्येक विजयाच्या वेळी तुझे तोंडभर कौतुक करणारी मराठी माणसे तुला आता दिसणार नासीत. आकाशाएवढ्या मनाने तुझ्यावर माया करणारी जिजामाता आईसाहेब आता तुला कशी भेटणार ? आणि त्या युगपुरुषाच्या पृथ्वीमोलाच्या प्रेमाचा एक थेंबही तुला आता लाभणार नाही. अरेरे ! नेताजी ! !'

इतक्यात कोठडीच्या कुलुपात किल्ली खरखरली. लोखंडी दरवाजा उघडला. फिदाईखान आणि पोलादखान आत शिरले.

नेताजीचा काळवंडलेला भेसूर चेहरा पाहून त्यांना गंमत वाटली. बादशाही सरदारांनी या असल्या दुबळ्या माणसाची उगीच दहशत घेतली होती, असेही त्यांना वाटले असेल.

ते दोघेही नेताजीकडे पाहून खदखदून हसले.

कोणीतरी आपले काळीज सुरीने कापीत आहे. असे नेताजीला वाटले. पण काय करू शकत होता तो यावेळी ? धरणी दुभंग होऊन आपल्याला पोटात घेईल तर बरे होईल, असेही त्याला वाटले असेल.

" क्यों, नेतू ? " फिदाईखानाने तुच्छतेने हाक मारली.

नेतू ! नेताजीच्या अभिमानावर आणखी एक आघात झाला. अहंकाराचा एकेक पापुद्रा गळून पडत होता.

नेताजी फिदाईखानाच्या उर्मट चेहऱ्याकडे पाहात राहिला.

जावळीच्या अरण्यात अफझलखानाच्या फौजेवर वाघासारखा तुटून पडलेला नेताजी कोठे गेला ? उंबरखिंडीत कारतलबखानाच्या अफाट सेनेची कत्तल करणाऱ्या नेताजीचा उत्साह आज कोठे लपला ? लक्ष्मेश्वरापर्यंत धडक मारणाऱ्या नेताजीची हिंमत कोठे गेली ? अरेरे ! नेताजी ! !

" क्यों, नेतू ? देहलीकी हवा कैसी है ? "

नेताजी काही बोलला नाही.

" आज की ठंडी कैसी लगी ? "

नेताजी काही बोलला नाही.

" यहाँसे भागना नहीं ! याद रखो ! "

नेताजी काही बोलला नाही.

" अगर भागनेकी कोशिश करोगे, तो जान नहीं बचेगी ! "

तरी नेताजी काही बोलला नाही.

" याद रखो । एक दिन तुम्हें बोलना पडेगा ! "

तरीही नेताजी काही बोलला नाही.

फिदाईखान आणि पोलादखान निघून गेले. दार बंद झाले. कुलूप लागले.

प्रकाशाची तिरीप थोडी आली होती, ती नाहीशी झाली. नेताजी पुन्हा अंधारात बुडून गेला. अंधार ! आता जन्मभर अंधार !

तो दिवस गेला. रात्र आली. तीही गेली. पुन्हा दिवस उगवला. पुन्हा फिदाईखान आणि पोलादखान आले.

आज त्यांची मुद्रा क्रूर दिसत होती.

" नेतू ! "

" ए, काफिर ! "

" जबान खोल. "

" सुनता है, या नहीं ? "

" देख ! अगर अभी जबान नहीं खोली, तो इस समशीरसे उसके टूकडे टूकडे कर दूँगा ! "

फिदाईखान आणि पोलादखान यांनी खूप दमदाटी केली; पण नेताजी बोलला नाही. आणि बोलणार तरी कसा ? त्यांची जीभच टाळ्याला चिकटली होती !

नेताजीला असा रोज खुराक मिळू लागला. हालहाल होऊन आपण मरणार, हे त्याला स्पष्ट दिसू लागले. आता शरण किंवा मरण !

शरण जाणे म्हणजे मुसलमान होणे आणि मरण म्हणजे मरणच !

विचार करून करून डोके फुटायची वेळ आली! खोलीतला अंधार नेताजीला हसत होता. वाघ कधी मरणाला भितो ? पण नेताजीच्या अंगातला वाघ कधीच मरून गेला होता. आता उरला होता– फक्त नेताजी– एक माणूस ! ह्या माणसाला ध्येय नव्हते, धर्म नव्हता, संस्कृती नव्हती ! काय उरले होते त्या माणसात आता ? त्या माणसाला जगण्यासाठी आता खायला अन्न हवे होते, प्यायला पाणी हवे होते, झोप हवी होती. पण कशासाठी जगायचे ? तेच तर त्याला कळत नव्हते.

– आणि पुन्हा फिदाईखान आणि पोलादखान आले !

" क्यों ? कैसी तबियत है ? "

" अच्छी है ! "

" क्या सोचा है ? "

" और क्या ? "

" तो तू मुसलमान होने को तैयार है ? अभी बादशाह सलामत खूश होंगे ! जीते रहो ! "

नेताजी मुसलमान व्हायला तयार झाला !

नेताजी संपला. खलास झाला. महाराष्ट्राचा नेताजी मेला !

पण यात नेताजीचा काही डाव तर नसेल ! हा गनिमी कावा तर नसेल ? मुसलमान होतो म्हणून सांगावे. मुसलमान व्हावे. सुटका करून घ्यावी आणि मग एकदम महाराष्ट्राकडे दौड मारावी !

नेताजीच्या मनात काय होते, हे त्याचे त्यालाच ठाऊक !

पण नेताजीची संमती ऐकून औरंगजेब खूश झाला. बहोत खूश झाला. बादशहाचा हुकूम सुटला. धर्मांतराची तयारी झाली.

नेताजी मुसलमान झाला. त्याचा धर्म बदलला. पेहराव बदलला. नाव बदलले. नेताजी आता झाला मुहंमद कुलीखान. तो बादशहाचा सरदार झाला. पाच हजारांची मनसब मिळाली त्याला.

पण महाराष्ट्रात पळून जाण्याची संधी त्याला मिळाली नाही. बादशहाने त्याच्यावर सक्त नजर ठेविली.

बादशाहाने आणखी डाव टाकला.

नेताजीचा चुलता कोंडाजी यालाही पकडून दिल्लीला आणले होते. त्याला इस्लाम धर्माची दीक्षा दिली.

– आणि दिलेरखानाला बादशहाचे फर्मान गेले. काष्ट-तांदळीला नेताजीच्या वाड्यात त्याच्या तीन बायका आहेत. त्यांना पकडून ताबडतोब दिल्लीला पाठवावे.

दिलेरखान म्हणजे बादशाहाचा इमानी सेनापती. असली कामे त्याला मनापासून आवडत.

त्याने ताबडतोब काष्टी-तांदळीला फौजेची एक तुकडी पाठविली. नेताजीच्या बायकांना पकडले आणि त्यांची दिल्लीला रवानगी केली.

औरंगजेबाला ही बातमी ऐकून आनंद झाला.

त्याने पाहिले, तो नेताजीच्या दोनच बायका आल्या होत्या. आणि तिसरी कोठे राहिली ? महाराष्ट्रात – श्रीगोंद्याजवळ – काष्टी – तांदळी गावात कारण ? तिचे आपल्या धर्मावर प्राणापलीकडे प्रेम होते. धर्मापुढे संपत्ती आणि सुख तिला तुच्छ होते !

– आणि नेताजी ? अरेरे ! नेताजी !!

# १०. मायभूमीची हाक

नेताजीचा गनिमी कावा फसला.

त्याने दिल्लीतून पळण्याचा प्रयत्न केला; पण मोगलांनी त्याला पकडले.

औरंगजेबाने नेताजीचा पुरा बंदोबस्त करायचे ठरविले.

औरंगजेबाने काबूलच्या पठाणांबरोबर कित्येक वर्षांपासून युद्ध चालू होते. तेथले पठाण मोठे दंगेखोर. मोगलांची सत्ता मानायला ते तयार नव्हते. वाटेल तेव्हा ते बादशहाविरुद्ध दंगा करीत. औरंगजेबाने खूप वेळा सैन्य पाठविले. पण पठाणांचा दंगा थांबला नव्हता.

आता नेताजी त्याच्या तावडीत सापडला होता. नेताजी म्हणजे डोंगरातला वाघ. पठाणही डोंगराळ मुलुखातले. त्यांच्याशी नेताजी चांगला मुकाबला करू शकेल. आणि समजा, पठाणांनी नेताजीला ठार केले, तर त्यात औरंगजेबाला कसले दुःख होणार होते ?

महाबतखान हा औरंगजेबाचा सरसेनापती होता. त्याच्या हाताखाली नेताजीची नेमणूक झाली.

नेताजी महाबतखानाबरोबर दिल्लीतून बाहेर पडला. मोठ्या फौजेनिशी बाहेर पडला.

नवा मुलूख, नवी माणसे, नवे रीतिरिवाज, नवा धर्म, नवा वेश, नवे नाव. सर्व काही नवे ! या नव्याचा नेताजीला वीट आला होता.

पण हे नवे सोडणार कसे ?

नेताजी संधीची वाट पहात होता.

फौज पुढे पुढे चालली होती. नवा नवा मुलूख नजरेला पडत होता. नव्या नव्या नद्या दिसत होत्या. सतलज दिसली. रावी दिसली. नवे नवे डोंगर दिसू लागले.

—आणि नेताजीचे मन चाळवले.

त्याला महाराष्ट्र आठवला. महाराष्ट्राची माती दिसू लागली. सह्याद्री दिसू लागला. साग, आईन या वृक्षांनी भरलेली जंगले दिसू लागली. भीमा, कृष्णा, गोदा, कोयना या नद्या दिसू लागल्या.

नेताजीचा जीव कासावीस झाला.

त्याला खंडोबाच्या पालीतील बालपण आठवले. तिथला डोंगर, शेतमळे, नदी, ओढे, माळ आठवले. चौक गाव दिसू लागले. कारवीचे जंगल दिसू लागले.

जावळीच्या अरण्यातली विजयी रात्र, पन्हाळगडच्या पायथ्याशी झालेली लढाई, उंबरखिंडीतली विजयाची दुपार आणि मोगल व विजापूरच्या मुलखात मारलेली घोडदौड त्याच्या मनासमोर दिसू लागली.

त्याला महाराष्ट्रातली माणसं आठवली. तानाजी मालुसरे, बाजी देशपांडे, मुरारबाजी, कान्होजी जेधे, हैबतराव सिलीमकर, मोरोपंत पिंगळे, अण्णाजी दत्तो .... त्याला अगणित माणसे आठवली. आपले सहकारी आज स्वराज्यासाठी दिवसरात्र तळहातावर शीर घेऊन लढत असतील; नी आपण ...?

जिजामाता आईसाहेबांची माया त्याला आठवली .... शिवाजी महाराजांची मूर्ती त्याच्या मनापुढे उभी राहिली !

नेताजी बेभान झाला.

—आणि नेताजी पळाला. महाबतखानाच्या छावणीवरून पळाला !

पण महाबतखान सावध होता. लाहोरहून पळालेल्या नेताजीला पकडण्यासाठी त्याने फौज पाठवली.



नेताजी सापडला. तो पुन्हा महाबतखानाबरोबर काबूलच्या दिशेने चालू लागला.

नेताजी मनातल्या मनात आपले सामर्थ्य समजून चुकला. तो मनात म्हणाला,

'नेताजी, शिवाजी महाराज म्हणजे युगपुरुष. लोक त्यांना शंकराचा अवतार समजतात, ते उगीच नाही. अरे, शिवाजी

म्हणजे श्रीकृष्ण आणि श्रीराम. तुला शत्रूने प्रतिशिवाजी म्हटलं, म्हणून तू चढून गेलास. अरे, महाराज औरंगजेबाच्या पंज्यातून सहीसलामत निसटले, म्हणून तू पळून जाऊ शकशील की काय? विसर, आता महाराष्ट्राला कायमचा विसर!'

—आणि नेताजी महाराष्ट्राला खरोखरच विसरला. पुरी दहा वर्षे विसरला. इतका विसरला, की औरंगजेब त्याच्यावर खूश झाला तो महाराष्ट्राला विसरला म्हणून.

औरंगजेबाने नेताजीला—म्हणजे मुहंमद कुलीखानाला दिलेरखानाच्या हाताखाली दक्षिणेत पाठविले. शिवाजी महाराजांशी लढण्यासाठी!

नेताजी दक्षिणेत उतरला. त्याला दहा वर्षांनी पुन्हा महाराष्ट्राचे दर्शन झाले. सह्याद्रीच्या शिखरांनी त्याला खुणावले. दाट अरण्यातील वेळूच्या बेटांनी त्याला शीळ घातली. महाराष्ट्रातील नद्यांनी खळखळून त्याला जुना इतिहास सांगितला. दऱ्याघळींनी त्याच्या मनाला गुदगुल्या केल्या. अफाट तांबड्या माळांनी त्याच्या डोळ्यांत अंजन घातले. मराठी भाषेतल्या शब्दांनी त्याच्या आत्म्याला खडबडून जागे केले. मराठी माणसांच्या भेटीने त्याच्या मनाचे डोळे उघडले. दहा वर्षांच्या स्वप्नातून नेताजी जागा झाला.

नेताजीने आपले डोळे चोळले आणि तो पुढल्या तयारीला लागला.

नताजीचे गुप्त पत्र महाराजांच्या हातांत पडले.

एक दिवस नेताजी परत येईल, याची महाराजांना खात्री होती. पण.... पण नेताजी मुसलमान झाला आहे.... हं! ठीक! महाराजांनी आपल्या विश्वासातील निवडक माणसांची गुप्त बैठक बोलाविली.

महाराजांनी नेताजीचे पत्र त्यांच्यासमोर मांडले आणि विचारले,

"बोला! या बाबतीत आपला काय सल्ला आहे आम्हांला?"

बिकट प्रश्न होता. थोडा वेळ सगळी मंडळी विचारात पडली. शेवटी कोणीतरी म्हटले,

"महाराज, नेताजी एक वेळ स्वराज्याचा सेवक होता. तेव्हा याबाबत महाराजच योग्य निर्णय घेऊ शकतील!"

"बरोबर बोललात!" महाराज म्हणाले, "नेताजी एक वेळ स्वराज्याचा सेवक होता. स्वराज्य घडविण्यात त्याने मोठी कामगिरी केली आहे. नेताजीची कामगिरी इतिहास विसरणार नाही. पण त्याच्या हातून शिस्तभंगाचा प्रमाद घडला. त्यामुळं स्वराज्यद्रोह आणि धर्मद्रोह हे प्रमाद घडले. इतिहास त्याचे हे प्रमादही विसरणार नाही. पण दहा वर्षांच्या पश्चात्तापाचं त्याला शासन झालं. या पश्चात्तापानं त्याचं मन पावन झालं आहे. आपण बजाजी निंबाळकरांना शुद्ध करून पुन्हा हिंदुधर्मात आणलं. नेताजीच्या बाबतीत तेच करता येईल. यात हिंदुधर्माची सेवा आहे, स्वराज्याची सेवा आहे. यानं नवा इतिहास घडेल. भावी पिढ्यांना यापासून योग्य धडा मिळेल. बोला, तुमचा काय सल्ला आहे?"

"महाराजांचा निर्णय अगदी बरोबर आहे!"

—आणि एक दिवस नेताजी घोड्यावर बसून दिलेरखानाच्या छावणीतून निसटला, तो रायगडाच्या दिशेने दौडत सुटला.

नेताजी शिवाजी महाराजांच्या समोर गेला. त्याने महाराजांच्या डोळ्यांकडे पाहिले नाही. एकदम त्यांचे पायच धरले. त्याने आपल्या आसवांनी महाराजांची पावले न्हाणिली. तो एवढेच म्हणाला,

" महाराज, अखेर मला महाराष्ट्राच्या मातीत मिळू द्या हो ! "

महाराज काही बोलले नाहीत. कारण याच नेताजीवर एकदा त्यांनी स्वराज्याइतके प्रेम केले होते. पण नेताजी ते समजू शकला नव्हता. तो चुकला, पस्तावला आणि आता परत आला होता.

* * *

म. ग्रं. सं, ठाणें, वाचनालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग
दा. क्र ...२४६... दिनांक .....
विषय ..किशोर.... क्र... २२८..

BVBK-0400248

बाल
आणि
किशोर
वाङ्मयात आम्हीच
अ ग्रे स र
आ हो त !
आमच्या प्रकाशनाचे
संपूर्ण सूचीपत्रक
आजच मागवा !

इंद्रायणी साहित्य,
१२५७ सदाशिव पेठ, पुणे-३०.

इंद्रायणी साहित्य